


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६८ ■ मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# सुप्रिया सुळेंनीही टोचले पार्थ पवारांचे कान

प्रतिनिधी ७ एप्रिल



**मुंबई:** भारतीय राजकारणात आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत काँग्रेस पक्षाचे योगदान अत्यंत मोठे आहे. देशाच्या पंतप्रधानापासून ते ग्रामपंचायतीच्या सरपंचापर्यंत, तसेच महिला आरक्षणापासून ते देशाने जिंकलेल्या युद्धांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर काँग्रेसची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. हे योगदान कोणालाही नाकारता येणार नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी काँग्रेसची पाठराखण केली. तसेच, लोकशाहीत प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार असला तरी मर्यादांचे भान हवे, असे म्हणत त्यांनी पार्थ पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, भारतातील संविधानाच्या चौकटीत राहून कोणताही पक्ष काम करत असेल, तर आपण लोकशाही मानणारी माणसे म्हणून त्याचा आदर केला पाहिजे. आम्ही सर्वांनी काँग्रेस पक्षाला अत्यंत जवळून पाहिले आहे. मी स्वतः अनेकदा काँग्रेसच्या साथीने निवडणूक लढवून निवडून आले आहे. मी आणि दादा (अजित पवार) दोघेही काँग्रेसच्याच तालमीत लहानाचे मोठे झालो आहोत. आज आपण जो मोकळा श्वास घेतोय आणि आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले आहे, ती काँग्रेसची देण आहे हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही.

पार्थ पवारांच्या संदर्भात शरद पवारांनी केलेल्या वक्तव्यावर भाष्य करताना सुळे म्हणाल्या की, 'कौटुंबिक सल्ले हे घराच्या चार भिंतींच्या आत दिले जातात, ते माध्यमांसमोर जाहीरपणे सांगायचे नसतात. मात्र, जेव्हा घरातील मोठी व्यक्ती काही बोलते, तेव्हा त्यावर प्रतिवाद न करणे किंवा उलट न बोलणे हे आमचे संस्कार आहेत.' या विधानातून त्यांनी शरद पवारांच्या भूमिकेचे पूर्णपणे समर्थन केले आहे.

### मविआचे मानले आभार

शरद पवार यांची राज्यसभा निवडणूक बिनविरोध झाल्याबद्दल सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडीसह महायुतीतील नेत्यांचेही आभार मानले. त्या म्हणाल्या, विरोधक हा आपला शत्रू नसून ती केवळ एक वैचारिक लढाई आहे, व्यक्तिगत नाही, हा यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा वारसा महाराष्ट्राने जपला आहे. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, हीच आपली संस्कृती आहे. याच सामंजस्यामुळे राज्यसभा निवडणूक बिनविरोध पार पडली.

### काँग्रेसने घेतलेली भूमिका लोकशाहीला धरूनच

राज्यातील पोटनिवडणुकांच्या मुद्द्यावर बोलताना सुळे यांनी स्पष्ट केले की, अनेकदा पोटनिवडणुका बिनविरोध होतात, तर कधी त्या लढवल्या जातात. काँग्रेसने यासंदर्भात घेतलेली भूमिका लोकशाहीला धरूनच आहे, त्यात काहीही गैर वाटत नाही. काँग्रेसशी कोणी संपर्क केला की नाही, याबद्दल मला कोणतीही अधिकृत माहिती नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# रुग्णाला मरणाच्या दारात सोडतात डॉक्टर

## जीएमसीत उपचाराअभावी हिवरखेड येथील रुग्णाचा मृत्यू; डॉक्टर रिल्स पाहण्यात मग्न!

प्रतिनिधी ७ एप्रिल



**अकोला:** गोरगरीब जनतेचा आधार मानल्या जाणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (जीएमसी) संतापजनक प्रकार समोर आला आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आणि 'ॲडमिशन' नाकारण्याच्या हट्टाहासामुळे एका रुग्णाला आपले प्राण गमवावे लागले आहेत. तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड येथील सुरेश मनोहर बांगर (वय अंदाजे ४५) यांचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याने आता शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश बांगर यांना प्रकृती खालावल्यामुळे ग्रामीण रुग्णालय, तेल्हारा येथून अकोल्याच्या जीएमसीत 'रेफर' करण्यात आले होते. सोमवार, ६ एप्रिल रोजी रात्री ११.४४ मिनिटांनी त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची पावती फाटली. पण, त्यांची प्रत्यक्षात ॲडमिशन करण्यात आली नाही. दाखल करणे टाळल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक आरोप त्यांच्या नातेवाईकांनी आणि मित्रमंडळींनी

### मृतकाच्या नातेवाईकांनी सांगितली आखोदेखी!

रुग्णालयातील भयावह वास्तव मांडताना नातेवाईकांनी सांगितले की, ज्यावेळी रुग्ण मृत्यूशी झुंज देत होता, त्यावेळी तेथील कर्तव्यावर असलेले वरिष्ठ डॉक्टर मोबाईलवर 'रिल्स' पाहण्यात दंग होते. रुग्णाकडे लक्ष देण्याऐवजी केवळ प्रशिक्षणार्थी (इंटर्न) डॉक्टरांच्या भरवशावर उपचार सोडले गेले होते. रुग्णाची प्रकृती गंभीर असतानाही त्यांना योग्य प्रतिसाद दिला गेला नाही. गंभीर रुग्णांना ॲडमिशन देण्यास टाळाटाळ करण्याचा प्रकार जीएमसीमध्ये नवीन नाही. अशाच प्रकारे अग्निशमन दलाच्या गाडीने धडक दिलेल्या तरुणाचा मृत्यू होळीच्या दिवशी झाला होता. 'तेल्हार ग्रामीण रुग्णालयाने रेफर केल्यानंतर या रुग्णाला स्वीकारण्यास विरोध का झाला? गंभीर रुग्णांना जर सरकारी रुग्णालय स्वीकारणार नसेल, तर हे रुग्णालय काय कामाचे?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. रुग्णाच्या ॲडमिशननंतर नेमके काय उपचार करण्यात आले, याचा कोणताही ठोस तपशील रुग्णालयाकडे उपलब्ध नसल्याचा आरोप होत आहे.

### रात्रीच्या डॉक्टरांची चौकशी व्हावी

सुरेश बांगर यांच्या मृत्यूला सर्वस्वी रुग्णालयाचा निष्काळजीपणा कारणीभूत असून, सोमवारी रात्री कर्तव्यावर असलेल्या सर्व डॉक्टरांची तातडीने चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. रुग्णाला मरणाच्या दारात सोडून देणाऱ्या अशा डॉक्टरांवर कडक कारवाई होणार का, की प्रशासन नेहमीप्रमाणे या प्रकरणावर पांघरूण घालणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'जीएमसीत रुग्ण मरावे यासाठीच प्रशासनाचा हट्टाहास आहे का ? हिवरखेडच्या रुग्णाचा बळी घेणाऱ्या दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हायला हवा.'

**महेंद्र बांगर** (मृतकाचा भाऊ)

# पाऊस कमी पडणार

वृत्तसंस्था ७ एप्रिल

**नवी दिल्ली:** एल निनोचा परिणाम यंदा मान्सूनवर होणार असल्याचा अंदाज स्कायमेट ह्या खासगी हवामान संस्थेने वर्तवला आहे. २०२६ मध्ये सरासरीपेक्षा यंदा कमी मान्सून पावसाचा अंदाज देखील स्कायमेटने वर्तवला आहे.

जून ते सप्टेंबर ह्या ४ महिन्यांच्या कालावधीत मान्सून पर्जन्यमान सरासरीच्या ९४ टक्के पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीत एल निनोची तीव्रता वाढण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. जून महिन्यात मान्सून तुलनेने स्थिर राहण्याची शक्यता असली, तरी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे.

देशातील मध्य आणि उत्तर-पश्चिम भागांमध्ये पावसाची कमतरता जाणवू शकते, ज्याचा शेती आणि जलस्त्रोतांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. भारतीय हवामान विभागाकडून पुढील आठवड्यात मान्सून हंगामासाठीचा आपला पहिला अंदाज जाहीर करण्याची शक्यता आहे.

# वशीकरण नव्हे, हातचलाखीने महिलांचे शोषण!

## एसआयटीसमोर खरातने दिली कबुली



प्रतिनिधी ७ एप्रिल

**नाशिक :** अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी सध्या अटकेत असलेला भोंदू ज्योतिषी अशोक खरात याच्या चौकशीमधून सातत्याने धक्कादायक माहिती समोर येत आहे. आपल्याकडे समस्या घेऊन येणाऱ्या महिलांना अशोक खरातने कसे जाळ्यात ओढले, तसेच कुठलीही बळजबरी न करता त्यांना आपल्यासोबत शरीरसंबंध प्रस्थापित करण्यासाठी कसे काय तयार केले, असा प्रश्न हे प्रकरण उघडकीस आल्यापासून सर्वसामान्यांपासून ते या प्रकरणाचा तपास करणाऱ्यांपर्यंत सर्वांना पडला होता. दरम्यान, याबाबत आता अशोक खरात यानेच एसआयटीसमोर माहिती दिली आहे. एसआयटीकडून सुरू असलेल्या चौकशीदरम्यान दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए म्हणत अशोक खरात याने त्याने अनेक महिलांचं लैंगिक शोषण केल्याची कबुली दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चमत्कार दाखवून किंवा वशीकरण करून नव्हे तर हातचलाखी करून आपण महिलांचं लैंगिक शोषण केल्याचं अशोक खरातने कबूल केलं आहे. तसेच ज्याला लोक चमत्कार किंवा वशीकरण समजतात, ती खरी तर हातचलाखी असल्याचे अशोक खरातने सांगितले आहे.

दरम्यान, अनेक महिलांचं लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात याच्यावर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ईडीने गुन्हा दाखल केला आहे. खरात याने अनेक ठिकाणचे भूखंड हडपण्यासह अवैधरीत्या अनेक मालमत्तादेखील खरेदी केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. तसेच ईडीच्या अधिकाऱ्यांनी खरातची कोठडी मिळवून चौकशी करण्याची तयारी सुरू केली आहे. खरातच्या मालमत्तांवर ईडीचे अधिकारी लवकरच छापेमारीदेखील करणार असल्याची माहिती ईडीमधील सूत्रांनी दिली आहे. तसेच खरातच्या नाशिकमधील कार्यालयासह 'तृप्तबाला' बंगल्यातून शेकडो आधार कार्ड तसेच पॅन कार्ड एसआयटीने जप्त केले आहेत.

# अमरावती–अकोला महामार्गावर भीषण अपघातात चार ठार!

## तिघे गंभीर जखमी, चहा पिऊन परतणाऱ्या युवकांवर काळाचा घाला

प्रतिनिधी ७ एप्रिल



**अमरावती:** अमरावती-अकोला महामार्गावर सोमवारी मध्यरात्री झालेल्या एका भीषण अपघातात बडनेरा येथील चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा विमानतळाजवळ ही हृदयद्रावक घटना घडली. विशेष म्हणजे, अपघातात प्राण गमावलेले चारही तरुण बडनेरा जुनी वस्ती येथील रहिवासी असल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बडनेरा येथील सात युवक मध्यरात्री चहा पिण्यासाठी बेलोरा विमानतळाजवळील एका हॉटेलमध्ये गेले होते. चहा घेऊन परतत असताना त्यांची कार अनियंत्रित होऊन रस्त्याकडच्या झाडावर जोरात आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, कारमधील चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. मृतकांत मोहम्मद अनस मोहम्मद सईद (२०), मोहम्मद तल्हा मोहम्मद अनीस (२२), मोहम्मद अवेझ मोहम्मद सईद (२६) व अब्दुल अनवेस अब्दुल सलीम (२२) सर्व रा. बडनेरा जुनी वस्ती तर गंभीर जखमीमध्ये अनस अनिस खान (२२), मो. असद (२३) व मो. हुजेफा यांचा समावेश असल्याची माहिती बडनेरा पोलिसांनी दिली.

या अपघातानंतर संबंधित ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून पंचनामा केला. सध्या पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अधिक तपास करत आहेत. कार अनियंत्रित होऊन झाडावर धडकल्याने हा अपघात झाला असल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी मंगळवारी पहाटेच्या सुमारास अपघाताची नोंद केली आहे.

# पाकिस्तानात आजपासून रात्री ८ वाजल्यानंतर सर्व बंद!

वृत्तसंस्था ७ एप्रिल

**इस्लामाबाद :** मध्यपूर्वेतील युद्धाचे चटके जगाला बसत असून अनेक देशांत ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. देशव्यापी ऊर्जा संकटावर तोडगा काढण्यासाठी पाकिस्तानी सरकारने पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ७ एप्रिल म्हणजेच आजपासून बहुतांश भागांतील बाजारपेठा, शॉपिंग मॉल्स आणि दुकाने रात्री ८ वाजल्यापासून बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जागतिक स्तरावर इंधनाच्या वाढलेल्या किमती आणि मध्य-पूर्वेतील सुरू असलेल्या संघर्षामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे, ज्याचा परिणाम जगभरातील अनेक देशांवर होत आहे.

### हॉटेल-रेस्टॉरंट्स, लग्नांवरही होणार परिणाम

सरकारच्या निर्देशांनुसार, बेकरी, रेस्टॉरंट्स, तंदूर, फूड आऊटलेट्स आणि लग्नसमारंभासाठीचे हॉल हे रात्री १० पर्यंत बंद झाले पाहिजेत. तर घरी होणारे खाजगी विवाह सोहळे देखील या कालावधीत आटोपून संपले पाहिजेत, अशी सूचना देण्यात आली आहे. मेडिकल स्टोअर्स आणि फार्मसीला या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे.

### इंधनाच्या दरात मोठी वाढ

आखाती युद्धामुळे पाकिस्तानमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली. ६ मार्च रोजी सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ५५ रुपयांनी वाढ केली. त्यानंतर, लगेचच महिन्याभराने २ एप्रिल रोजी पेट्रोलचा दर वाढला आणि प्रति लिटरसाठी ४५८.४१ रुपये आणि डिझेलसाठी प्रति लीटर ५२०.३५ मोजावे लागत आहेत. मात्र नंतर सरकारने पेट्रोलचा दर प्रति लिटर ३७८ रुपयांपर्यंत कमी करून तात्पुरता दिलासा दिला.

# तीन चिमुकल्या भावंडांचा विषबाधेने मृत्यू!

## धाड येथील हृदयद्रावक घटना; आईसह एका चिमुकलीवर उपचार सुरू

प्रतिनिधी ७ एप्रिल



**बुलडाणा :** धाड येथील एकाच कुटुंबात आईसह तीन मुली व एक मुलगा अशा पाच जणांना विषबाधा झाली. यातील तीन लहानग्या बहीण-भावांचा मृत्यू झाला तर आईसह एका चिमुकलीवर बुलडाणा येथील खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. सोमवारी घडलेल्या या घटनेने परिसरावर शोककळा पसरली आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचे प्रथमदर्शनी समोर येत आहे.

मोहम्मद अली मोहम्मद वसीम जमदार (४), मशिरा मोहम्मद वसीम जमदार (७) व फातिमा मोहम्मद वसीम जमदार (८) या तीन बहीण-भावांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आई अफरीन मोहम्मद वसीम जमदार (३४) व अश्मिरा वसीम जमदार (३) या दोघींवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोहम्मद वसीम जमदार यांची पत्नी, तीन मुली व एक मुलगा अशा पाच जणांना रविवारपासून पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास सुरू होता.

सोमवारच्या सकाळी त्रास वाढत गेल्याने सर्वांना रुग्णालयात नेण्यात आले. उपचारादरम्यान अली व मशिरा यांचा मृत्यू झाला. आई व दोन मुलींना बुलढाणा येथे हलविण्यात आले. आई अफरीन यांच्यावर खासगी रुग्णालयात तर मुलगी फातिमा व अश्मिरावर बालरोगतज्ज्ञांकडे उपचार सुरू होते. सायंकाळी पावणेआठच्या सुमारास उपचार सुरू असताना फातिमा हिची प्राणज्योत मालवली. अश्मिराची प्रकृती बरी असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सकाळी मृत्युमुखी पडलेल्या अली व मशिरा या दोघांचे दुपारी शवविच्छेदन करण्यात आले. दुपारीच त्यांचे पार्थिव घरी नेण्यात आले. सायंकाळच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या संपूर्ण घटनेमुळे धाड परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेचा तपास करण्यात येत आहे.

# विजय अग्रवाल यांच्या पुढाकाराने अकोल्यात जनचळवळ सुरू!





प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला:** अकोला शहराची जीवनवाहिनी असलेल्या मोर्णा नदीला तिचे जुने वैभव परत मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टी आणि अकोला महानगरपालिका पुन्हा एकदा सरसावली आहे. आज ७ एप्रिल रोजी सकाळी निमवाडी येथील गणेश घाटावर या भव्य 'मोर्णा नदी स्वच्छता अभियानाचा' शानदार प्रारंभ झाला. या उपक्रमात स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सक्रिय सहभाग नोंदवत स्वच्छतेसाठी पुढाकार घेतल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.हे अभियान केवळ एक दिवसाचे नसून, मोर्णा नदी पूर्णतः स्वच्छ होईपर्यंत हे प्रयत्न सुरू राहणार आहेत. विजय अग्रवाल आणि महापौर शारदा खेडकर यांनी आवाहन केले आहे की, शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानाशी जोडून घेऊन अकोल्याला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी आपले योगदान द्यावे.

### विजय भाऊंच्या नेतृत्वाचा प्रभाव

या स्वच्छता अभियानाच्या नियोजनात विजय अग्रवाल यांनी विशेष लक्ष दिले असून, मनपा प्रशासकीय यंत्रणा आणि भाजप संघटन यांच्यात योग्य समन्वय साधण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. आज सकाळी ८ वाजता प्रत्यक्षात घाटावर उतरून त्यांनी स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले. 'मोर्णा नदी केवळ पाण्याचा स्रोत नसून ती अकोल्याची ओळख आहे. या नदीचे प्रदूषण रोखणे आणि स्वच्छता राखणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे,' अशा शब्दांत त्यांनी नागरिकांमध्ये चैतन्य फुंकले.

### लोकप्रतिनिधींची उपस्थिती आणि लोकसहभाग

खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर आणि शहर अध्यक्ष जयंत मसने यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान राबवण्यात आले. निमवाडी गणेश घाटावर आज सकाळपासूनच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अकोल्यातील विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने गोळा झाले होते. सर्वांनी हातात झाडू आणि स्वच्छतेची साधने घेऊन नदीपात्रातील कचरा व जलपर्णी हटवण्यास सुरुवात केली. यावेळा आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंता मसने, मनपा सभापती विजय अग्रवाल, महापौर खेडकर, उपमहापौर अमोल घोगे, मनपा गटनेते पवन महल्ले, महामंत्री संजय गोटफोडे, डॉक्टर अभय जैन, संतोष पांडे, संदीप गावंडे, रणजीत खेडकर, श्रीकांत भीरड, राजेंद्र गिरी, वैशालीताई शेळके, चंदाताई शर्मा, अम्रपाली उपरवट, आरतीताई घोगलिया, कल्पनाताई घोटफोडे, संदीप शेकोकार, सागर शेगोकार, अमोल मोहकार, विशाल इंगळे, प्रवीण जगताप, जमीर खान, कपिल बुंदेले, नितीन ताकवाले, हर्षद भांबेरे, प्रकाश घोगलीया, परिहार, हेमंत पंडित, निलेश तायडे, डॉक्टर राजू देशपांडे, डॉक्टर सुजित फोकमारे आदी भाजपचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहितीचा अधिकार म्हणजे काय?

लोकप्रशासनाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी माहितीच्या अधिकाराचे खूप महत्त्वाचे स्थान असणार आहे. प्रशासनात पारदर्शकता आल्यामुळे भ्रष्टाचारासही पायबंद बसू शकेल. तसेच माहितीच्या अधिकारामुळे प्रशासनाचे उत्तरदायित्वही वाढीस लागेल. माहितीचा अधिकार म्हणजे सरकारकडून माहिती मागवण्याचे लोकांचे स्वातंत्र्य होय. भारतात 'माहिती कायदा' ११ मे २००५मध्ये केंद्र सरकारने मंजूर केला. १२ ऑक्टोबर २००५पासून हा कायदा अंमलात आला. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला भाषण आणि विचार स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्काचाच भाग म्हणजे माहितीचा अधिकार होय. माहितीचा अधिकार हा व्यक्तीचा नैसर्गिक, मानवी आणि मूलभूत अधिकार आहे. या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा असल्यामुळे त्यात साध्या कायद्याप्रमाणे बदल किंवा सुधारणा सरकारला करता येत नाहीत. तसेच मूलभूत अधिकाराचा दर्जा या अधिकाराला असल्यामुळे हा अधिकार साध्या कायद्याप्रमाणे काढून घेतला जाऊ शकत नाही.

# 'सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया

दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि




स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.

आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो.

शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.

डॉ. राजेंद्र बगाटे
समाजशास्त्राचे अभ्यासक


# वेदना, विवेक आणि वास्तव यांचा जिवंत दस्तऐवज

## डॉ. दिवाकर आचार्य यांची 'पिळ' कादंबरी

काही पुस्तके वाचून संपतातष्ठआणि काही पुस्तके मनात कायमची घर करून बसतात. 'पिळ' ही दुसऱ्या प्रकारची कादंबरी आहे. दिवाकर कृष्णराव आचार्य यांनी लिहिलेली 'पिळ' ही केवळ कथा सांगणारी साहित्यकृती नाही; ती मानवी संवेदनांचा आरसा आहे. ही कादंबरी वाचताना वाचक फक्त घटनांचा साक्षीदार राहत नाही, तर तो त्या घटनांचा भाग बनतो. प्रत्येक प्रसंग वाचकाच्या विचारविश्वाला हलवून टाकतो आणि मनाच्या आत खोलवर काहीतरी हलते – कधी करुणेचा स्पर्श, कधी अस्वस्थतेची जाणीव, तर कधी आत्मपरीक्षणाची गरज.

या कादंबरीची सर्वात मोठी ताकद म्हणजे तिचा प्रामाणिकपणा. कथा कोणताही दिखावा करत नाही, भावनांचे प्रदर्शन करत नाही, उपदेश देत नाही — ती शांतपणे वास्तव उलगडते. जीवनातल्या वेदना, जबाबदाऱ्या, निर्णयांचे ओझे, नैतिक द्वंद्व आणि माणूस म्हणून उभे राहण्याची कसोटी — हे सारे घटक सहजपणे कथानकात मिसळलेले दिसतात.

'पिळ'मध्ये मानवी जगण्याची एक वेगळी बाजू उलगडते. माणूस आणि त्याच्याशी जोडलेले जीव, त्यांच्याशी निर्माण होणारे भावनिक बंध, त्या नात्यांमधील जबाबदारी आणि कधी कधी येणारी अपरिहार्य वेदना — या सर्वांचा अनुभव कादंबरी अत्यंत जिवंतपणे देते. वाचकाला जाणवते की येथे केवळ कथानक नाही, तर अनुभवांची साठवण आहे.




लेखनशैली सहज, प्रवाही आणि परिणामकारक आहे. संवाद नैसर्गिक आहेत, वर्णने ओघवती आहेत आणि वातावरणनिर्मिती इतकी प्रभावी आहे की अनेक प्रसंग डोळ्यांसमोर दृश्यरूपाने उभे राहतात. भाषा अलंकारिक न वाटता जिवंत वाटते — ती थेट मनापर्यंत पोहोचते.

'पिळ' ही कादंबरी वाचकाला प्रश्न विचारायला भाग पाडते. आपण घेत असलेले निर्णय योग्य आहेत का? करुणा म्हणजे नेमके काय? जबाबदारी ही केवळ कर्तव्य आहे की संवेदनशीलतेचा विस्तार? माणूस स्वतःच्या मर्यादा कशा ओळखतो? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे कादंबरी थेट देत नाही, पण ती प्रश्नांची जाणीव जागी करते — आणि तेच खरे साहित्याचे यश असते.

या कादंबरीत भावनिक खोली आहे, विचारांची धार आहे आणि वास्तवाचे वजन आहे. त्यामुळे 'पिळ' ही केवळ मनोरंजनासाठी वाचायची कादंबरी राहत नाही, तर ती अंतर्मुख करणारा अनुभव बनते. वाचन संपल्यानंतरही तिचे पडसाद बराच काळ मनात घोळत राहतात.

आजच्या वेगवान, वरवरच्या वाचनाच्या काळात अशी संवेदनशील, अर्थपूर्ण आणि प्रामाणिक कादंबरी दुर्मीळ होत चालली आहे. 'पिळ' वाचकाला थांबायला भाग पाडते, विचार करायला शिकवते आणि माणूस म्हणून अधिक सजग बनवते.

ज्यांना दर्जेदार मराठी साहित्य वाचायचे आहे, ज्यांना वास्तवाचा सामना करणाऱ्या कथा आवडतात, ज्यांना भावना आणि विचार यांचा सुंदर संगम अनुभवायचा आहे — अशा प्रत्येक वाचकासाठी 'पिळ' ही एक आवश्यक वाचन अनुभूती आहे.

कादंबरी मानवी जीवनाकडे तटस्थ नजरेने पाहते. दुःख हे येथे अपवाद म्हणून येत नाही, तर अस्तित्वाचा अविभाज्य भाग म्हणून प्रकट होते.

मानवी नात्यांचा पीळ हा केवळ भावनिक गुंतागुंत नसून जीवनाच्या रचनेतच गुंफलेला आहे.

त्यामुळे हा पीळ कोणालाच टाळता येत नाही, केवळ स्वीकारता येतो. ही कादंबरी मानवी अस्तित्वाचा मूलभूत प्रश्न उपस्थित करते — वेदनेपासून मुक्ती शक्य आहे का, की तीच जीवनाची अपरिहार्य साक्ष आहे?

या प्रश्नाचे थेट उत्तर न देता, वाचकाला आत्मपरीक्षणाकडे प्रवृत्त करते. सहनशीलता, स्वीकार आणि काळ यांच्याद्वारेच माणूस या पीळाशी तडजोड करत जगतो, ही जीवनतत्त्वज्ञानाची जाणीव कादंबरी ठळकपणे अधोरेखित करते.

विदर्भाची भाषा आणि कथानक पुढे नेणारे प्रवाही संवाद यामुळे ही कादंबरी अस्सल, जिवंत आणि वास्तववादी वाटते.एका वेगळ्या विषयाला स्पर्श करणारी ही कादंबरी वाचकांच्या हाती ठेवल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.. अशी प्रतिक्रिया कवी प्रशांत असनारे यांनी व्यक्त केली आहे.

प्रा. दत्तात्रय विद्यासागर
अकोला.९९६०९९१९९१

# अवेळी पडणारा पाउस पिकांसाठी हानिकारक



अवेळी पडणारा पाऊस हा शेतीसाठी मोठा धोका मानला जातो. हवामानातील अनिश्चिततेमुळे अलीकडच्या काळात अवेळी पावसाचे प्रमाण वाढले आहे, आणि याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या पिकांवर होत आहे. पिकांच्या वाढीच्या टप्प्यावर किंवा कापणीच्या वेळी पडणारा अवेळी पाऊस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करतो. अकोला जिल्ह्यातही पावसामुळे नुकसान झाले आहे.

अवेळी पावसामुळे पिकांची गुणवत्ता घसरते. कापणीस तयार असलेला गहू, हरभरा व धान्य ओलसर झाले. आणि त्याची साठवणूक करणे कठीण होते. ओलसरपणामुळे धान्याला बुरशी लागते, ज्यामुळे त्याची बाजारातील किंमत कमी होते. फळबागांमध्येही अवेळी पावसामुळे फळे गळून पडली. आंबा, पपई, केळी आदी फळांचे नुकसान झाले. बाजारात त्याचा परिणाम दिसून येत आहे.

दुसरे म्हणजे, अवेळी पावसामुळे शेतजमिनीची रचना बिघडते. जास्त पावसामुळे मातीतील पोषक घटक वाहून जातात, ज्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. परिणामी पुढील हंगामातील उत्पादनावरही परिणाम होतो. तसेच, पाण्याचा निचरा नीट न झाल्यास पिकांच्या मुळांवर परिणाम होऊन पिके सडू शकतात.

तिसरे म्हणजे, अवेळी पावसामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. ओलसर वातावरणामुळे बुरशीजन्य रोग झपाट्याने पसरतात. यामुळे शेतकऱ्यांना अधिक कीटकनाशके वापरावी लागतात, ज्यामुळे खर्च वाढतो आणि पर्यावरणावरही विपरीत परिणाम होतो.

अवेळी पावसाचा सर्वात मोठा परिणाम आर्थिकदृष्ट्या शेतकऱ्यांवर झाला. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटणार आणि कर्जबाजारीपणा वाढेल. अनेक वेळा शेतकरी पुन्हा शेती करण्यासाठी आवश्यक भांडवल उभारू शकत नाहीत, त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट होते.

या समस्येवर उपाय म्हणून हवामान अंदाज अधिक अचूक करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना पूर्वसूचना मिळू शकेल. तसेच, जलसंधारण, योग्य निचरा व्यवस्था, आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर यामुळे नुकसान काही प्रमाणात कमी करता येऊ शकते. शासनानेही शेतकऱ्यांना विमा योजना व आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.

एकूणच, अवेळी पाऊस हा शेतीसाठी गंभीर आव्हान आहे. यावर योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान कमी होईल आणि शेती क्षेत्र स्थिर राहील.

# शंख : शास्त्रीय अन् धार्मिक महत्त्व!

हिंदू धर्मात शंखाला खूप धार्मिक महत्त्व मानले गेले आहे. सनातन परंपरेत असे मानले जाते की, शुभ आणि सौभाग्याचे प्रतीक मानला जाणारा शंख ज्या घरात दररोज पूजा केली जाते त्या घरात नेहमीच शुद्धता आणि सकारात्मक ऊर्जा राखतो आणि पूजेच्या वेळी वाजवला जातो. हिंदू मान्यतेनुसार, शंख आणि माता लक्ष्मी समुद्र मंथनाच्या वेळी प्रकट झाल्या, म्हणूनच ती माता लक्ष्मीचा भाऊ मानली जाते. विशेषत: नारायण पूजेमध्ये वापरल्या जाणाऱ्या या शंखाच्या उपासनेचे नियम, महत्त्व आणि उपाय याबद्दल तपशीलवार जाणून घ्या. पूजा करताना शंख वाजवण्याची परंपरा हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. शंखाला पवित्रता, शुभत्व आणि दिव्य ऊर्जा यांचे प्रतीक मानले जाते.

धार्मिक मान्यतेनुसार, शंखाचा नाद नकारात्मक ऊर्जा दूर करून सकारात्मक वातावरण निर्माण करतो. असे मानले जाते की शंखध्वनीमुळे वातावरणातील अशुद्धता कमी होते आणि मन एकाग्र होण्यास मदत होते. त्यामुळे पूजा सुरू करताना किंवा आरतीच्या वेळी शंख वाजवण्याची प्रथा आहे. शंखाचा आवाज हा 'ॐ' या पवित्र ध्वनीसारखा असल्याचेही सांगितले जाते, ज्यामुळे आध्यात्मिक शक्ती जागृत होतात. शंखाचे महत्त्व पौराणिक कथांमध्येही आढळते.

भगवान विष्णू आपल्या हातात शंख धारण करतात, ज्याला 'पांचजन्य' असे म्हणतात. महाभारतातही युद्ध सुरू होण्यापूर्वी शंखनाद केला जात असे, जो विजय आणि धैर्याचे प्रतीक मानला जातो. शंख वाजवणे म्हणजे एक प्रकारे दैवी शक्तींना आमंत्रण देणे आणि वाईट शक्तींना दूर ठेवणे असे



मानले जाते. त्यामुळे मंदिरांमध्ये आणि घरी पूजा करताना शंख वाजवण्याला विशेष स्थान आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले असता, शंख वाजवल्याने फुफ्फुसांचा व्यायाम होतो आणि श्वसनक्रिया सुधारते. शंख वाजवताना खोल श्वास घ्यावा लागतो, ज्यामुळे शरीरात ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. यामुळे मन शांत राहते आणि ताण कमी होतो. तसेच, शंखाच्या ध्वनीमुळे आसपासच्या वातावरणात कंपन निर्माण होतात, ज्यामुळे काही सूक्ष्म जंतू नष्ट होण्यास मदत होते, असेही मानले जाते. एकूणच, शंख वाजवणे हे धार्मिक, आध्यात्मिक आणि आरोग्याच्या दृष्टीनेही फायदेशीर आहे.

ज्या व्यक्तीला पैशाची इच्छा असेल त्याने घरात एक खास मोत्याचा शंख ठेवला पाहिजे. सनातन परंपरेत हे देवी लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते. असे मानले जाते की ज्या घरात माता लक्ष्मीसह या शंखाची पूजा केली जाते त्या घरात पैशाची कमतरता भासत नाही. हा शंख चंद्राची शुभ फळे देतो. दक्षिण शंखात दूध आणि गंगाजल भरल्याने भगवान विष्णू, भगवान कृष्ण आणि भगवान राम लवकरच अभिषेकाचा आशीर्वाद घेतात. हा उपासनेचा उपाय केल्याने नारायणासह लक्ष्मीच्या आशीर्वादाचा वर्षाव होतो.

हिंदू मान्यतेनुसार, पूजेच्या ठिकाणी दक्षिण शंखात शुद्ध पाणी भरल्याने देवी लक्ष्मी घरात कायमची निवास करते आणि तिची कृपा नेहमीच टिकून राहते.

**घरी शंख कसे आणि कोठे ठेवावे?**

हिंदू मान्यतेनुसार शंख नेहमी घरात पूजेच्या वेळी किंवा पवित्र ठिकाणी ठेवला पाहिजे. शंखशिंपले कधीही जमिनीत ठेवू नयेत. ते नेहमी पेडेस्टल किंवा स्टँडवर ठेवा. शंख नेहमी पूजेच्या ठिकाणी किंवा घरात ईशान्य कोपऱ्यात म्हणजेच ईशान्य दिशेला ठेवावा.

**शंखा संबंधित महत्त्वाचे नियम**

पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या शंखात नेहमी पाणी ठेवावे आणि पूजा पूर्ण झाल्यानंतर या शंखाचे पाणी घरातील सर्व कोपऱ्यांवर आणि लोकांवर शिंपडले पाहिजे. शंखाचे शुभत्व प्राप्त होण्यासाठी दररोज सकाळ-संध्याकाळ पूजेत तो वाजवला पाहिजे. वापरानंतर शंख नेहमी शुद्ध पाण्याने स्वच्छ करावे. भगवान शिवाच्या उपासनेत शंखाचे पाणी कधीही विसरता कामा नये. शंख नेहमी पूजेनंतरच वाजवला पाहिजे. घरात विनाकारण शंख वाजवू नये.

**शंखाची पूजा करण्याचे आणि वाजवण्याचे फायदे**

हिंदू मान्यतेनुसार, ज्या घरात शंखाची पूजा केली जाते, त्या घरात धनाची देवी माता लक्ष्मी नेहमी प्रसन्न होते. ज्या घरात शंख असतो आणि तो रोज फुंकतो, त्या घरात असलेले सर्व प्रकारचे दोष दूर होतात. दररोज शंख फुंकल्याने सकारात्मक उर्जेचा प्रवाह येतो आणि घरातील वातावरण नेहमीच शुद्ध राहते. शंख फुंकणे आरोग्यासाठीही फायद्याचे असते. असे मानले जाते की शंख फुंकल्याने फुफ्फुसे मजबूत होतात आणि एखाद्या व्यक्तीची श्वसन क्षमता सुधारते.

## तहसीलदारांची कर्तव्य...!

महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ अन्वये राज्य शासन प्रत्येक तालुक्यासाठी एक 'तहसीलदार' नेमते. तहसीलदारालाच 'मामलेदार' असेही नाव प्रचलित आहे. हे गट 'अ' प्रकारचे पद आहे. जमीन महसूलाबाबत कोणताही अर्ज सर्वप्रथम तहसीलदारासमोर येतो. त्यावर त्याने योग्य निर्णय घेतल्यावरच तो वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जातो. जमीन महसुलाशिवाय पिकांची आणेवारी काढणे ही महत्त्वाची जबाबदारी तहसीलदारावर असते. या आणेवारीच्या आधारेच दुष्काळाची स्थिती जाणून घेऊन त्याची घोषणा केली जाते. यानंतर सरकारने नियमांनुसार निश्चित केलेली नुकसानभरपाई तहसीलदाराच शेतकऱ्यांपर्यंत पोहचवतो. तालुक्यातून गौण खनिजांचे उत्खनन करायचे असेल (उदा. वाळू) तरी तहसीलदाराची परवानगी घ्यावी लागते. स्वस्त धान्य दुकानांवर देखरेख ठेवणे व काळाबाजार रोखणे ही कामेही तो करतो. तहसीलदार तालुका दंडाधिकारी म्हणून देखील काम करतो. कायद्याची पदवी न घेताही तो अर्ध न्यायिक जबाबदाऱ्या पार पाडतो. त्यात समन्स पाठवणे, प्रसंगी अटक वॉरण्ट काढणे, दंड करणे असे अधिकार येतात.नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी यांना मार्गदर्शन करणे, वेळोवेळी आपल्या कार्याचा अहवाल प्रांताधिकाऱ्यांकडे सादर करणे आणि तालुक्यात नैसर्गिक संकट आल्यास त्यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे त्वरित सादर करणे, ही कामे तहसीलदारास करावी लागतात. वरील जबाबदाऱ्यांचे बारकाईने अवलोकन केले तर लक्षात येईल की ज्याला आपण सरकार म्हणतो त्याचे दृश्यरूप म्हणजे तहसीलदार आहे. विशेषत: ग्रामीण भागात तहसीलदार हा तालुक्यातील प्रशासन व्यवस्थेचा केंद्रबिंदू ठरतो. तहसील कार्यालय पूर्णपणे त्याच्या हाताखाली काम करते. एकप्रकारे जिल्ह्यात जे स्थान जिल्हाधिकाऱ्याचे, तितकेच किंबहुना त्याहून महत्त्वाचे स्थान तालुक्यात तहसीलदाराचे आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शिवसेना वसाहतीत हल्ल्यात मधुकरराव गंगाने गंभीर जखमी

**जखमीवर सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू**

**अकोला:** जुने शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या शिवसेना वसाहत परिसरात एका अज्ञात आरोपीने मधुकरराव गंगाने नामक व्यक्तीवर जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. प्राप्त माहितीनुसार, मधुकरराव गंगाने हे आपल्या राहत्या परिसरात असताना एका अज्ञात इसमाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. आरोपीने धारदार शस्त्राने वार केल्यामुळे गंगाने हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले, जिथे सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच जुना शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरू केला आहे.

## व्हाईस ऑफ मीडिया'च्या अकोला जिल्हाध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार शंकर जोगी यांची नियुक्ती



**अकोला :** पत्रकारितेच्या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि सामाजिक कार्याचा वारसा जपणारे ज्येष्ठ पत्रकार शंकर रामराव जोगी यांची आंतरराष्ट्रीय ख्यातीची पत्रकार संघटना 'व्हाईस ऑफ मीडिया' च्या अकोला जिल्हाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते जोगी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. ही नियुक्ती ऑनलाइन झूम मीटिंगद्वारे पार पडली. या बैठकीस आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के, प्रदेश मुख्य संयोजक तथा संचालक गोरक्षनाथ मदने, विदर्भ अध्यक्ष किशोर कारंजेकर, तसेच नरेंद्र देशमुख आणि व्यंकटेश दुदमवार यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. यावेळी मार्गदर्शक म्हणून रुबेन वाळके आणि अरुणभाऊ मोडक, तसेच विधी सल्लागार ॲड. संजय एस. देशमुख, सचिन मुर्तंडकर उपस्थित होते.

## तरुणांनी श्री रामाचा आदर्श घेणे गरजेचे-हभप सौ कुलकर्णी

**अकोला:** युवाशक्तीने सुयोग्य संस्कार, नवा आकार,नवे विचार प्राप्त करण्यासाठी श्रीरामाचा आदर्श घेणे गरजेचे आहे. मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम यांच्या अवतार कार्याचे चिंतन करून शाश्वत सुखाची प्राप्ती करण्याचें प्रतिपादन हभप संध्याताई देशपांडे यांनी केले. दाबकी रोड येथील रेणुका नगरातील श्रीराम व गजानन महाराज मंदिरात रामनवमी पर्वात आयोजित उत्सवात हभप संध्याताई देशपांडे यांनी कीर्तन केले.

# खामगावच्या अडत व्यापाऱ्याला घुसर रोडवर लुटले

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला:** खामगाव येथील एका अडत व्यापाऱ्याला अकोल्यातील घुसर रोडवर लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका महिलेने फोन करून भेटायला बोलावले आणि त्यानंतर ब्लॅकमेल करून व्यापाऱ्याला लुटण्यात आले. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलिसांनी तातडीने तपास करत एका तरुणासह दोन महिलांना अटक केली असून, त्यांच्याकडून लुटलेला मुद्देमालही जप्त केला आहे.

प्रथमदर्शनी हे संपूर्ण प्रकरण 'हनी ट्रॅप' असल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार व्यापारी यांचे खामगावच्या दालफैल भागात अडतचे दुकान आहे. एका महिलेने त्यांना फोन करून भेटायला बोलावले होते. त्यानंतर व्यापारी आणि ती महिला व्यापाऱ्याच्या गाडीने घुसर रोडवरील हॉटेल शौर्यवाडा येथे पोहोचले.गाडी थांबवून

**◆ सासू-जावयाचे नाटक करून काढले अश्लील फोटो**
**◆ सिव्हिल लाईन पोलिसांची कारवाई तिघांना बेड्या**

खाली उतरताच अचानक एका मोटारसायकलवरून एक तरुण आणि एक वृद्ध महिला तिथे आले. त्या तरुणाने आपण त्या महिलेचा पती असल्याचे आणि वृद्ध महिलेने आपण सासू असल्याचे भासवले. 'माझ्या पत्नीला घेऊन कुठे फिरत आहेस?' असा जाब विचारत त्यांनी व्यापाऱ्याला धमकावण्यास सुरुवात केली.आरोपींनी व्यापाऱ्याला जवळच असलेल्या एका शेतात नेले, तिथे त्यांचा शर्ट काढायला लावून महिलेसोबत मोबाईलवर फोटो आणि व्हिडिओ शूट केले. व्यापाऱ्याला शिवीगाळ व मारहाण करून त्यांची सोन्याची अंगठी हिसकावून घेतली आणि अडीच लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास फोटो-व्हिडिओ व्हायरल करून बदनामी करण्याची धमकीही दिली. घटनेनंतर व्यापाऱ्याने तातडीने सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने तपास चक्र फिरवली आणि तीन आरोपींना बेड्या ठोकल्या. या प्रकरणात मुर्तिजापूर च्या खरप ढोरे चा नितेश प्रभाकर थोप, लता निलेश थोप, मोठी उमरी संजय नगर येथील लीलाबाई वसंतराव पाखरे यांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आरोपींकडून व्यापाऱ्याची सोन्याची अंगठी, फोन पे द्वारे घेतलेले १०,००० रुपये, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि ज्या मोबाईलमध्ये व्हिडिओ शूट केले होते तो मोबाईल, असा एकूण ७५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिव्हिल लाईन पोलीस करत आहेत.

# ओसवाल समाज ट्रस्टच्या वतीने निःशुल्क नेत्र तपासणी शिबिर

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव प्रित्यर्थ येथील ओसवाल समाज ट्रस्टच्या वतीने निःशुल्क नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जवाहर नगर रस्त्यावरील गादीया आय आरोग्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये डॉ. सौरभ गादीया आणि डॉ. कल्याणी गादीया यांनी रुग्णांची नेत्र तपासणी केली. या शिबिरात ७५ रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली . या तपासणीमध्ये चष्म्याचा नंबर काढणे, मोतीबिंदू तपासणी, रेटीना तपासणी सह अन्य नेत्र रोगांची तपासणी करण्यात आली. चष्म्याची गरज असलेल्या



रूग्णांना ओसवाल समाज ट्रस्टच्या वतीने निःशुल्क चष्मे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. माणिकचंद ओस्तवाल यांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी डॉ. अभय जैन, ओसवाल ट्रस्टचे अध्यक्ष विनोद गोलेच्छा, डॉ. नवीन कोठारी,प्रा. सुभाष गादीया, डॉ. अजय संघवी,राजेंद्र बंब, शैलेंद्र पारख, सतिश खटोड, सागर राका, राजेश कोटेचा, अजय बागरेचा, प्रशांत कोठारी, अतुल नाहटा, आशिष जैन, राजेश सोजतिया,नरेश चौधरी, सुशिल गोलेच्छा,रितेश पारख, अतुल बरडिया उपस्थित होते.

# ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई; ५ गोवंशांना जीवदान

वि.प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोट:** ग्रामीण पोलिसांनी ६ एप्रिल रोजी कारवाई करत ५ गोवंशांना जीवदान दिले असून एकूण ५,०४,२५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अकोलखेड ते मोहाळा मार्गावरील खर्डा परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप (क्र. श्प् ३० ४१७३) संशयित अवस्थेत आढळून आली. वाहनामध्ये गोवंश जनावरे कोंबून कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ धाड टाकली.

पोलिसांना पाहताच वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला. मात्र, शेख मुस्ताक शेख मुक्तार (वय २५, रा. मोहाळा, ता. अकोट) यास ताब्यात घेण्यात आले.



चौकशीत सदर जनावरे व वाहन हे अब्दुल आरीफ अब्दुल गफार (वय ५०, रा. नंदीपेठ, अकोट) यांचे असल्याची माहिती समोर आली.

या कारवाईत पोलिसांनी ४० किलो गोवंश मांस, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे ३ सुरे, ३ कुऱ्हाडी, लाकडी ठोकळे, लोखंडी पेचकस तसेच अन्य साहित्य असा एकूण ९,२५० रुपयांचा माल जप्त केला. तसेच ५ गोवंश (अंदाजे किंमत १,४५,००० रुपये) आणि बोलेरो पिकअप (अंदाजे किंमत ३,५०,००० रुपये) असा एकूण ५,०४,२५० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात दादाराव लिखार, वासुदेव ठोसरे, हरिष सोनवणे, निलेश खंडारे, सागर नागे, उमेशचंद्र सोळंके, सुधीर झटाले, विठ्ठल चव्हाण, उषा सिरसाट, नंदू नेमाडे, गोपाल जाधव व राजेश माळेकर यांच्या पथकाने कारवाई केली.

# जि. प. प्रा. शाळा चांदूरच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर भरारी

प्रतिनिधी ७ एप्रिल



**अकोला:** स्नॉट ऑलंपियाड मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये विविध विषयामध्ये चांदूर शाळेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. यामध्ये पहिलीतील रूदई रत्नदीप घुगे, वर्ग सहावीतील जय विनोद वानखडे हे राष्ट्रीय स्तरावर प्रथम तर वेदिका मंगेश इंगळे ही आठवीतील विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक मिळवला.

शाळेतील २४ विद्यार्थी झोनल स्तरावर विविध क्रमांक मिळवून यशस्वी ठरले आहेत. यामध्ये आरोही सोळंके, शिव इंगळे, आयुष तायडे, माही इंगळे, शिवानी खताळे, रूदई घुगे, शुभम काकडे, जय वानखडे, प्रभु शहापूरे, अभिनव पळसका आरव वानखडे, रूद्र खताळे, आराध्या वानरे, शारदा तायडे, तन्वी वैतकार, जान्हवी वानरे, आराध्या मिरगे, समृद्धी चिलवंत राशी पद्मणे, वेदिका इंगळे, प्रिया डाबेराव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सोबतच शाळेतील एकूण ६३ विद्यार्थी जिल्हास्तर गुणवत्ता यादीत झळकले आहेत. विद्यार्थ्यांच्या नेत्रदीपक कामगिरीमुळे सर्व स्तरातून तसेच सर्व पालक वर्गाकिडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# अकोला जिल्ह्यात सावता परिषद नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला:** सावता परिषद अकोला जिल्ह्यात विविध पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात आल्या असून या नियुक्त्या संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभाग प्रदेश अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे, महाराष्ट्र महासचिव प्रविण भाऊ वाघमारे, जिल्हाध्यक्ष लक्ष्मण निखाडे तसेच कार्याध्यक्ष बालुभाऊ बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा व तालुका पातळीवरील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. त्यानुसार प्रदीप भाऊ काळपांडे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, बंडु भाऊ राऊत यांची महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी सुनील भाऊ ढाकोलकार, प्रविण निलखन व दिलीप गिर्हे यांची निवड करण्यात आली.

जिल्हा संघटक म्हणून किशोर ठाकरे, सतीश पोपळे व सचिन धनोकार यांची निवड झाली असून कोषाध्यक्षपदी रविराज शेवलकार यांची नियुक्ती करण्यात आली.रमेश भड यांची जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली

तालुका पातळीवर बाळापूर तालुका प्रमुख म्हणून प्रकाश म्हसने, अकोला तालुका प्रमुख म्हणून श्रीकांत इंगळे , तर मुर्तिजापूर तालुका प्रमुख म्हणून सुरेंद्र मेहरे यांची निवड करण्यात आली. शिवा हुशे यांची बाळापूर तालुका संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली. पातूर शहर अध्यक्षपदी किरणकुमार निमकंडे, अकोट तालुका प्रमुख म्हणून रोहन झगडे, तसेच अकोला तालुका प्रसिद्धी प्रमुख म्हणून विठ्ठल बोळे यांची निवड जाहीर करण्यात आली. या सर्व नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सावता परिषद मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# कुटासा फाट्यानजीक रस्त्यावर धोकादायक भेगा

प्रतिनिधी ७ एप्रिल

**◆ नागरिकांचा टोलविरोधात संताप**

**कुटासा:** अकोला–अकोट मुख्य मार्गावरील कुटासा फाट्यानजिक रस्त्यावर पडलेल्या मोठ्या भेगामुळे वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून येथे दररोज अपघात घडत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. विशेषतः मोटारसायकलस्वारांचे पुढील चाक भेगेत अडकून पडल्याने अनेक जण जखमी होत आहेत.या मार्गावरून दररोज शेकडो वाहनांची ये-जा होत असते. कामानिमित्त अपडाऊन करणारे नागरिकही मोठ्या प्रमाणात या रस्त्याचा वापर करतात. मात्र रस्त्याची दयनीय अवस्था आणि मोठी भेग यामुळे प्रवास करताना नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून जावे



लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विभाग व ठेकेदारांकडून रस्त्याची दुरुस्ती करण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. वारंवार अपघात होत असूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. दरम्यान, या मार्गावर टोल वसुली सुरू करण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येताच नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आधी रस्ता व्यवस्थित करा, मगच टोल वसुली करा,ङ्ग अशी ठाम मागणी नागरिकांकडून केली जात आहे.अपघात टाळण्यासाठी तात्काळ दुरुस्ती करावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्या तिन्ही आरोपींचा जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोट:** १२ वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या तिन्ही आरोपींचा जमानत अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. आर. पटारे यांनी फेटाळला. तेल्हारा पोलिस स्टेशन अंतर्गत प्रकरण आहे.

आरोपी मंगेश पांडुरंग वानखडे ४७ वर्ष, प्रवीण पांडुरंग वानखडे ३६ वर्ष, गजानन जयदेव भोम ६८ वर्ष (ज्याला पिडीता मुलगी आबा म्हणायची), तिघेही रा. आडसुळ फाटा ता. तेल्हारा यांनी १२ वर्ष वयाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण आहे. सर्व आरोपी अकोला कारागृहात २५.१२.२०२५ पासुन बंदीस्त आहे. सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करताना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला की, या प्रकरणात फिर्यादी पीडित अल्पवयीन मुलीच्या शाळेतील मुख्याध्यापकांनी पो.स्टे. ला फिर्याद दिली की, त्यांचे शाळेमध्ये इयत्ता सातती मधे शिकत असलेली पिडिता हिने तिचे शाळेमध्ये समुपदेश कार्यक्रम सुरू असताना तिचे वडिल आणि काका तसेच गजानन भोम हे तिचेवर अत्याचार करीत असल्याचे सांगितले आहे. तरी बालिकेला न्याय मिळावा आणि योग्य हिताच्या दृष्टिने बालकल्याण समिती अकोलाला माहिती देवून तसेच बालिकेशी संवाद साधल्यावर तिची आई वेडसर असून ती फिरस्ती असते असे तिने सांगितले. बालकल्याण समितीने मुलीच्या पालकांचा शोध घेवून येईपर्यंत प्रिया इंगळे प्यारा मेडिकल सखी वन स्टॉप सेंटर अकोला यांना सपोर्ट पर्सन नेमुन फिर्यादीला सहाय्य करण्याची सुचना दिली.

# हिवरखेड परिसरात गुप्तधन काढणारी टोळी सक्रिय ?

प्रतिनिधी ६ एप्रिल

**हिवरखेड:** गणेश अग्रवाल यांच्या मालकीच्या दिवानझरी शेत सर्वे ४ ब या शेतात ४ व ५ एप्रिलला मध्यरात्री अज्ञात इसमांनी जेसीबी मशीनचा वापर करून १० ६१ २ चा गड्डा खोदून पूजा, नारळ शेंदूर व विविध प्रकारचे पूजेचे साहित्य वापरून गुप्तधन काढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शेतमालक गणेश अग्रवाल ६ एप्रिलला सकाळी शेतात गेले असता हा सर्व प्रकार उघडकीस आला. अग्रवाल यांनी तात्काळ पोलीस स्टेशन हिवरखेड व संबंधित यंत्रणेला तात्काळ माहिती दिली. बरेच दिवसापासून हिवरखेड व परिसरात गुप्तधन काढणारी व शोधणारी टोळी सक्रिय झाली असून सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या जंगलात वाघाची/ बिबट्याची भीती निर्माण करून गुप्तधन शोधले जात असल्याचा संशय आहे. याबाबत कारवाई करावी अशी मागणी गणेश



अग्रवाल यांनी केली आहे.

# होमगार्ड तालुका प्रभारी समादेशकपदी सुधाकर कराळे यांची नियुक्ती

प्रतिनिधी ७ एप्रिल

**पातूर :** पातूर येथील होमगार्ड पथकात गेल्या एक वर्षापासून प्रभारी समादेशक संतोष ढबारे (बाळापूर) यांच्या कडे अतिरिक्त च्यार्ज सोपविण्यात आला होता.त्यामुळे पातूर येथील होमगार्डना कार्यालयीन कामकाजासाठी बाळापूर येथे वारंवार जावे लागत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.ही बाब जिल्हा होमगार्ड समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेतली. जिल्हा समादेशक चंद्रकांत रेड्डी त्यांच्या आदेशानुसार तसेच प्रशासिक अधिकारी अशोक आसोलकर,लिपिक



प्रमुख शिवाजी आघाव, कार्यालयीन लिपिक अभिषेक देशमुख,प्रशिक्षण अधिकारी सुनील पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५ मार्च रोजी पातूर पथकातील होमगार्ड सुधाकर विश्वनाथ कराळे यांच्याकडे पातुर तालुका प्रभारी समादेशक पदभार सोपविण्यात आला.

सुधाकर कराळे यांच्या नियुक्तीमुळे पातूर पथकात समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.दि.५ एप्रिल रोजी साप्ताहिक कवायतीदरम्यान उपस्थित होमगार्डच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी माजी तालुका प्रभारी समादेशक संगीता इंगळे यांनीही त्यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी उपस्थित होमगार्डच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह दिसून येत होता.सुधाकर कराळे यांच्या नियुक्तीमुळे पातूर पथकात खेळीमेळीचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# मजुरीच्या वादातून खून; आरोपीला जन्मठेप

प्रतिनिधी ७ एप्रिल

**यवतमाळ :** मजुरीच्या पैशांच्या किरकोळ वादातून झालेल्या खुनाच्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. यु. बघेले यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी हा निकाल दिला.

सचिन वंदन पाटील (वय २६, रा. अंजी, ता. घाटंजी) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्यास भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा तसेच १० हजार रुपयांचा दंड ठोठावला असून दंड न भरल्यास दोन वर्षांचा अतिरिक्त



सक्तमजुरीचा कारावास भोगण्याचे आदेश दिले.

या प्रकरणातील घटना १३ जानेवारी २०२० रोजी रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास अंजी येथे घडली. मृतक अरविंद कोहरे हे आपल्या घरी पत्नी पुनेरता अरविंद कोहरे (वय ३० वर्षे) व दोन लहान मुलांसह उपस्थित असताना आरोपी सचिन पाटील त्यांच्या घरी आला. 'आज तुझा हिशोब करतो' असे म्हणत त्याने अरविंद कोहरे यांना घराबाहेर बोलावले. त्यानंतर दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि ते ग्रामपंचायत कार्यालयाजवळ गेले. तेथे आरोपीने लाकडी दांडक्याने अरविंद कोहरे यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. या गंभीर मारहाणीत अरविंद कोहरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही संपूर्ण घटना मृतकाची पत्नी पुनेरता कोहरे यांनी प्रत्यक्ष पाहिली.

घटनेनंतर पुनेरता कोहरे यांनी घाटंजी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा क्र. २९/२०२० अंतर्गत भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर भुजाडे यांनी करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

सदर खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पुनेरता कोहरे, पंच साक्षीदार विवेक मधुकरराव ठाकरे व राहुल ज्ञानेश्वर डंभारे, तसेच शवविच्छेदन करणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र विठोबा बन्सोड (ग्रामीण रुग्णालय, आर्णी) आणि तपास अधिकारी किशोर भुजाडे यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. तसेच इतर परिस्थितीजन्य पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले. सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील ॲड. विजय एस. तेलंग यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना घाटंजी पोलीस ठाण्यातील महिला पैरवी अधिकारी हवालदार सारिका बोधनकर (ब. नं. १५५९) यांचे सहकार्य लाभले. सर्व पुरावे आणि साक्षी विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# 'वंचित'चे झुणका-भाकर आंदोलन

## 'कब मिलेगा सिलेंडर?'; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल

प्रतिनिधी ७ एप्रिल



**यवतमाळ :** घरगुती गॅस सिलेंडरच्या वाढत्या दरांविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने यवतमाळ शहरातील संविधान चौक येथे अनोखे आंदोलन करण्यात आले. "कब मिलेगा सिलेंडर?" असा सवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात संताप व्यक्त केला.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या आवाहनानुसार राज्यव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ येथे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. महिलांनी प्रत्यक्ष चुली पेटवून झुणका-भाकर तयार करत वाढत्या महागाईचा निषेध नोंदवला. गॅस सिलेंडर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्याने पुन्हा चुलीकडे वळण्याची वेळ आल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी कार्यकर्त्यांनी तयार केलेल्या भाकरीचा आस्वाद घेत सरकारच्या धोरणांवर टीका केली. डॉ. नीरज वाघमारे यांनी गळ्यात गॅस सिलेंडरची माळ घालून प्रतीकात्मक आंदोलन करत सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधले. तसेच शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना झुणका-भाकर, कांदा व मीठ देत निवेदन सादर केले.




या आंदोलनात नगरसेविका मीराताई वीर, जिल्हा महासचिव अशोक कुमार कयापाक, संजय इंगळे, शिवदास कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष विशाल पोले, उपाध्यक्ष शैलेश भानवे, सचिन राऊत, रवी बच्छराज, कायदेविषयक सल्लागार आनंद भगत, सल्लागार केशव भागवत, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख गजानन कोकाटे, शहराध्यक्ष प्रसन्नजीत भवरे, शहर कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, शहर महासचिव विलास वाघमारे, शहर उपाध्यक्ष अरविंद दिवे, नितेश पाटील, रामदास वीर, उत्तम कांबळे, चंद्रकांत वाळके, देवानंद लोणारे, दिलीप वाकोडे, समाजसेवक सुरेश पवार, रामराव राठोड, दशरथ राठोड, संजय गुजर, प्रा. पंढरी पाठे, सचिन मनवर, संतोष मसराम, सचिन मोहोड, तालुकाध्यक्ष रणधीर चव्हाण, नामदेव इंगोले, संदीप भगत, राहुल खंतडे, विकास बोरकर, मंगेश पाईकराव, राजेश बनसोड, रविंद्र नगराळे, प्रकाश तायडे, राजेंद्र सातपुडके, महेंद्र मुनेश्वर, मोहन रूपनर, पुष्पाताई शिरसाठ, भारती सावते, करुणा चौधरी, सविता तिडके, संगीता भवरे, रत्नमाला कांबळे, निशा निमकर, सुकेशनी खोब्रागडे, उषा ढोकणे, शीला अंबादे, सुशीला गजभिये, लता भरणे, रेखा गुजर, पल्लवी कांबळे, संध्या काळे आदींसह महिला व कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

दरम्यान, हे आंदोलन जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत राबविण्यात आले असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये वाढत्या महागाईबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.




■ **दारव्हा :** तालुक्यातील दारव्हा, बोरी व बोदेगांव इत्यादी गॅस एजन्सींवर नागरिकांना बुकिंग केल्यानंतर दहा ते पंधरा दिवस सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी गॅस सिलेंडर मिळावे म्हणून गॅस एजन्सी समोर अशा प्रकारे नंबर लावल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गोडाऊनवर सिलेंडर असूनही घरपोच पुरवठा न होणे, एका महिन्यात एकच सिलेंडर मिळणे यावर सखोल चौकशी व साठेबाजी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी तसे न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# कास्ट्राईब महासंघाचे राज्य अधिवेशन; आश्रमशाळांच्या दर्जावाढीवर भर

प्रतिनिधी ७ एप्रिल

**आर्णी :** कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या आदिवासी विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन नाशिक येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अधिवेशनात शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी अरुण गाडे होते. यावेळी आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विचारमंचावर महासचिव सुशील तायडे, महिला राज्य कार्यकारीणी अध्यक्षा सुवर्णा इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दिनकर पावरा, प्रा. मधुकर उईके, संभाजी भगत, एकनाथ मोरे, अनिल धांडे, हरिश्चंद्र रामटेके,




श्यामराव हाडके, यशवंत माटे, विनोद बनसोड, राजू रायमले, उत्तम राऊत, भीमराव घोरपडे, संतोष साबळे, नाना पटाईत, संजय ठाकूर आदी उपस्थित होते.

अधिवेशनात बोलताना आयुक्त लीना बनसोड यांनी आश्रमशाळांचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्याचा मानस व्यक्त केला. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी दाई, केअरटेकर तसेच महिला चौकीदार नेमण्याचा प्रस्ताव असल्याचे त्यांनी सांगितले. शाळांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी सर्व स्तरांवर समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महासंघाच्या वतीने विविध मागण्या मांडण्यात आल्या. यात २०१८ च्या एनसीपीसीआर वसतिगृह नियमावलीची अंमलबजावणी, गृहपाल संवर्गाला राजपत्रित दर्जा, आहारतज्ज्ञ पदनिर्मिती, ८-८ तासांच्या पाळ्यांमध्ये कर्मचारी नियुक्ती, शिक्षकांवरील अतिरिक्त भार कमी करणे, निवासी अधीक्षक व मुख्याध्यापक पदनिर्मिती, रद्द पदे पुन्हा सुरू करणे तसेच कास्ट्राईब एम्प्लॉयमेंट एक्सचेंज पुन्हा कार्यान्वित करणे आदींचा समावेश होता.

एनसीपीसीआर नियमावली लागू झाल्यास ५० विद्यार्थ्यांमागे ११ कर्मचारी आवश्यक ठरणार असून यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व ठराव वाचन सुशील तायडे यांनी केले. सूत्रसंचालन सिताराम राठोड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. एकनाथ मोरे यांनी केले.

या अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपाली राऊत, पूनम साबळे, राजश्री भानगुडे, वंदना देवतळे, मीना महाजन, प्रांजली शिंदे, रेणुका कोडापे, ललिता मसराम, अपर्णा दुर्गे, उज्वला सिडाम, त्रिशला खुणे, माधुरी लोखंडे, शुभांगी ढवळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# 'मेजर ध्यानचंद चषक' हॉकी स्पर्धा; नागपूर ऑरेंज सिटीचा दणदणीत विजय

प्रतिनिधी ७ एप्रिल

**यवतमाळ :** यवतमाळ पोलीस बॉईज संघटनेतर्फे आयोजित 'मेजर ध्यानचंद चषक राज्यस्तरीय ओपन हॉकी स्पर्धा २०२६'चा समारोप अभ्यंकर कन्या शाळेच्या क्रीडांगणावर उत्साहात पार पडला. क्रीडारसिकांच्या प्रचंड उपस्थितीत झालेल्या अंतिम सामन्यात नागपूर ऑरेंज सिटी संघाने रेंज पोलीस, नागपूर संघावर ३-० अशी मात करत विजेतेपद पटकावले.

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या अंतिम सामन्यात नागपूर ऑरेंज सिटीने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत वर्चस्व राखले. त्यांच्या भेदक आक्रमणासमोर नागपूर रेंज पोलीस संघाला बचावात्मक भूमिका घ्यावी लागली.

अखेर ३-० अशा फरकाने सामना जिंकत नागपूर ऑरेंज सिटीने 'ध्यानचंद चषक २०२६'वर आपले नाव कोरले.



विजेत्या संघाचे नेतृत्व कर्णधार मोहम्मद शादाब यांनी केले, तर उपविजेत्या नागपूर रेंज पोलीस संघाचे नेतृत्व अमोल खराबे यांनी सांभाळले. दोन्ही संघांनी उत्कृष्ट क्रीडाप्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

समारोप व पारितोषिक वितरण समारंभाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

रमेश मुनोत, मोहन गांधी, अमनभाई, विजुभाऊ राय, मुख्याध्यापिका सुनिता दर्डा, डॉ. अमित पाली, वनिता बोंडे, गायक जितेंद्र पाखरे, प्रदीप मेटेकर, गिरीराज (बंटी) गुप्ता आदींच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक व पारितोषिके प्रदान करण्यात आली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी यवतमाळ पोलीस बॉईज संघटना, यंग ब्रिगेड क्रीडा मंडळ, जयभारत क्रीडा मंडळ तसेच अभ्यंकर कन्या शाळेचे प्रशिक्षक आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# मुकुटबन शेतकऱ्यांचे आमरण उपोषण संपले; कंपनीने मागण्या मान्य केल्या

प्रतिनिधी ७ एप्रिल

**झरी जामणी :** तालुक्यातील मुकुटबन येथील शेतकरी अंकित डोहे यांनी गेल्या चार दिवसांपासून ईशान कॅल्सी व डोलोमाईट माईन्स, चिलाई यांच्या विरोधात सुरू केलेले आमरण उपोषण अखेर संपुष्टात आले आहे.

शेतकऱ्यांचा आरोप होता की, कंपनीमधून निर्माण होणारी धूळ आणि अवजड वाहतूक रस्त्यावरून शेतात जात असल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अंकित डोहे यांनी उपोषण सुरू केले होते.

स्थानिक प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंमध्ये चर्चा घडवून आणली. या चर्चेत राजीव कासावार, ठाणेदार




सतीश जाधव, डॅनी सॉड्रावार, सुरेंद्र गेडाम, गणेश बेलेकर, संतोष बरडे, निलेश बेलेकर, संदीप धोटे, शंकर डोहे, पोलीस पाटील पिदुरकर, सत्यनारायण भुटा, मारोती अलकरवार, प्रविण गोहणे, राकेश वनकर, बादल जाधव, लक्ष्मण टोंगे, मंगल टोंगे, प्रमोद पिंपळकर आणि प्रनव पुसनाके यांनी पुढाकार घेतला.

चर्चेनंतर कंपनीने शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आणि उपोषण मागे घेतले. यावेळी ईशान कॅल्सीचे व्यवस्थापक राजेश फंटींग उपस्थित होते. या निर्णयामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पुसद येथे काँग्रेसचे 'संगठन सृजन अभियान'

प्रतिनिधी ७ एप्रिल

**पुसद :** ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वतीने देशभर राबविण्यात येत असलेल्या 'संगठन सृजन अभियान' अंतर्गत पुसद येथे मंगळवारी महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. रेस्टहाऊस येथे आयोजित या बैठकीत पक्ष संघटना अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस संजय कपूर (निरीक्षक), भय्याजी पवार (जिल्हा निरीक्षक), शकूर नागाणी (प्रदेश निरीक्षक), प्रदेश काँग्रेस महासचिव डॉ. मोहम्मद नदीम, जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल मानकर,




## संघटन बळकटीकरणावर भर

प्रदेश अल्पसंख्याक महासचिव सय्यद इस्तियाक, तालुका अध्यक्ष विलास वाघमारे, शहराध्यक्ष झिया शेख यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी संघटन बळकटीकरण, पक्षविस्तार आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी संवाद वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले. बूथस्तरापर्यंत कार्यकर्त्यांची मते जाणून घेणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षात सामील करून घेणे तसेच जुन्या कार्यकर्त्यांना सक्रिय करणे, हा अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भक्कम संघटन उभारण्याचे आवाहनही करण्यात आले. बैठकीस स्थानिक पदाधिकारी, नगरसेवक, सरपंच तसेच काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी विमा भरपाईच्या प्रतीक्षेत!

## प्रशासनाचे दुर्लक्ष; विमा कंपन्यांची टाळाटाळ

प्रतिनिधी ७ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील हजारो शेतकरी २०२५ च्या खरीप हंगामातील पिक विमा भरपाईसाठी अद्यापही प्रतीक्षेत असून प्रशासन व विमा कंपन्यांच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. अतिवृष्टी, महापूर व मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र, नुकसान होऊन अनेक महिने उलटूनही शेतकऱ्यांना भरपाई मिळालेली नाही.



तालुक्यातील पोफाळी, मुळावा, उमरखेड, ढाणकी, बिटरगाव, दराटी, निंगणूर, खरबी, चातारी, बोरी, देवसरी, मार्लेगाव, सुकळी, टाकळी, दहागाव, कुपटी, अंबाळी, बारा, नागापूर, पळशी, जनुना, हातला, दिवट, पिंपरी, तरोडा, कळमुला, गंगणमाळ, वानेगाव, पार्डी आदी गावांतील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत विमा भरला होता. तरीदेखील नुकसान भरपाईबाबत विमा कंपन्या टाळाटाळ करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ऑगस्ट ते ऑक्टोबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मुग, ज्वारी, हळद, ऊस व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी पिके मातीसह वाहून गेली. त्यानंतर रब्बी हंगामातही अवकाळी पावसामुळे गहू व हरभरा पिकांना फटका बसला. नैसर्गिक आपत्ती, वाढते कर्ज, बँकांकडून कर्जपुरवठ्यात होणारी टाळाटाळ आणि वाढते व्याज यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मार्च महिन्यात विमा मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, मार्च उलटूनही एक रुपयाचीही मदत मिळालेली नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. विमा कंपन्यांकडून फोन न उचलणे, योग्य प्रतिसाद न देणे यामुळे शेतकऱ्यांचा संताप अधिकच वाढला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन देऊन तातडीने पिक विमा भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणीही पुढे येत आहे. तालुक्यातील हजारो शेतकरी अजूनही भरपाईच्या प्रतीक्षेत असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

**अमरावती :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे बुधवार दि. ८ एप्रिल आणि गुरूवार, दि. ९ एप्रिल रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. दौऱ्यानुसार, बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती आगमन व कार्यालयीन कामकाज. दुपारी ३ वाजता विश्रामगृह, अचलपूर येथे तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडीसंबंधी बैठक व चर्चा. दुपारी ४ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. सायंकाळी ७ वाजता चिखलदरा विश्रामगृह मुक्काम. गुरूवार, दि. ९ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता धारणी विश्रामगृह येथे तालुक्यातील शेतकरी आत्महत्याबाबत बैठक व चर्चा, तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांचे समवेत आदिवासी शेतकऱ्यांच्या योजनांबाबत बैठक व चर्चा करतील.

# १६ सिलेंडर चोरी मधील दोन सराईत गुन्हेगारांना अटक

### ♦ सिलेंडर चोरीचा गुन्हा आणि जनावर चोरीचे ३ गुन्हे उघडकिस आणले

प्रतिनिधी ७ एप्रिल



**अमरावती :** १६ सिलेंडर चोरी मधील दोन सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

या प्रकरणी सिलेंडर चोरीचा गुन्हा आणि जनावर चोरीचे ३ गुन्हे उघडकिस आणले. गाडगेनगर येथे फिर्यादी मोहम्मद साजीद मोहम्मद नासीर वय ३६ वर्ष रा.अकबर नगर, अमरावती यांनी तक्रार दिली की, ट्रान्सपोर्ट नगर अमरावती येथुन त्यांचेकडील एकुण १६ सिलेन्डर कोणी तरी अज्ञात इसमांनी चोरी केले आहे अशा तक्रारीवरून अज्ञात आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशनला अपराध क्रमांक ३४२/२०२६ कलम ३०५ (क) भान्या सं. चा गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखेचे पथक हे सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदार कडुन खात्री लायक माहीती मिळाली की दिनांक ०४/०४/२०२६ रोजी ट्रान्सफर्पोर्ट नगर येथुन गाडी मधुन इंडियन कंपणीचे १६ सिलेन्डर चोरी झाले होते ते शेख आतीक शेख रउफ रा. बिसमिल्ला नगर याने व त्याचे साथीदारांनी चोरले आहे व ते एका कारमधे घेउण विक्री करण्याकरीता चपराशिपुरा सुंदरलाल चौक जाणाऱ्या रोड ने हॅलो कॉर्नर हॉटेल समोर थांबले आहे. अशा माहिती वरून हॅलो कॉर्नर चपराशीपुरा येथे जावुन पाहणी केलली असता दोन इसम हे एक पाढयाऱ्या रंगाची स्विप्ट डिजायर एम एच ४० एसि ५१५८ या गाडीत बसलेले दिसुन आले. नमुद गाडीजवळ जावुन गाडीमधील इसमांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे शेख अतीक शेख रउफ वय ३१ वर्ष रा. बिसमिल्ला नगर अमरावती, मोहम्मद कासीफ मोहम्मद अकबर वय २३ वर्ष रा. फिरदोश कॉलनी अकोला. ह. मु. कारंजा जि. वाशिम असे सांगितले. त्यांचे गाडीची पाहणी केली असता गाडीमध्ये एकुण १६ सिलेंडर मिळुन आले. त्याबाबत त्यांना विचारपुस केली असता त्यांनी सदर १६ सिलेंडर हे ट्रान्सफोर्ट नगर येथुन चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यांचे ताब्यातुन नमुद चोरी केलेले १६ सिलेंडर व गुन्हयात वापरलेली स्विप्ट डिजायर असा एकुण ५,३१,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतले.

सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना नमुद आरोपीतांनी आयुक्तालय हद्दीत जनावर चोरी केल्याबाबत कबुली दिली आहे.

आरोपी शेख अतीक शेख रउफ वय ३१ वर्ष रा. बिसमिल्ला नगर अमरावती, मोहम्मद कासीफ मोहम्मद अकबर वय २३ वर्ष रा. फिरदोश कॉलनी अकोला. ह.मु. कारंजा जि. वाशिम यांनी सिलेंडर चोरी तसेच जनावर चोरी केल्याबाबत असे एकुण ४ गुन्हे उघडकिस आणले आहे. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त शाम घुगे , पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे साहेब, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, सुनिल लासुरकर, संभाजी केंद्रे, आस्तीक देशमुख, सचिन बहाळे, अतुल संभे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चेतन गुल्हाने यांनी केली आहे.

# धावपळीच्या जीवनात आरोग्याची काळजी घ्या

### ♦ तज्ज्ञांचा जागतिक आरोग्य दिनानिमित्त सल्ला

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती :** ७ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण जगभर जागतिक आरोग्य दिन साजरा केला जात असून, या निमित्ताने आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत आरोग्य कसे जपावे ? याबाबत विविध तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ.भूषण थोरात बालरोग तज्ञ यांनी सांगितले की, लहान मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा, मोबाईलचा छंद आणि चुकीच्या आहाराच्या सवयी वाढताना दिसत आहेत. त्यामुळे मुलांना सकस आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.



तसेच नेत्रतज्ञ डॉ.विपुला थोरात यांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले. सध्या मोबाईल, संगणक आणि टीव्हीचा वाढता वापर यामुळे डोळ्यांवर ताण येत आहे. दर २० मिनिटांनी स्क्रीनपासून दूर पाहणे, योग्य प्रकाशात काम करणे आणि नियमित नेत्रतपासणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आयुर्वेदाचार्य योग व पंचकर्म तज्ञ डॉ.उन्मेष डालके यांनी आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्य टिकवण्यावर भर दिला. संतुलित आहार, दिनचर्या आणि योग-प्राणायाम यांचा अवलंब केल्यास शरीर निरोगी राहू शकते. तसेच ऋतूनुसार आहार आणि जीवनशैली बदलणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकूणच, आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तपासणी, योग्य आहार, व्यायाम आणि मानसिक संतुलन राखणे अत्यंत गरजेचे असल्याचा संदेश या तज्ज्ञांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त दिला.

# शहरातील सराईत गुन्हेगार बादल किशोर लुंड यास MPDA कायद्यान्वये केले स्थानबध्द

प्रतिनिधी ७ एप्रिल



**अमरावती :** अमरावती शहर येथील कुख्यात गुन्हेगार बादल किशोर लुंड वय २५ वर्ष रा. माया नगर, अमरावती हा सन २०२० पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सकिय आहे. त्याचे विरुध्द पोलीस स्टेशन राजापेठ आणि बडनेरा अमरावती शहर येथे जबरी चोरी करतांना ईच्छा पुर्वक दुखापत करणे, दुखापत करणे, बलादग्रहणाबद्दल शिक्षा, गैरकायदयाची मंडळी, बेकायदशीर जमाव जमवणे, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, चोरी, साधी दुखापत करणे, फौजदारीपात्र धाकदपटबद्दल शिक्षा, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाचे उल्लघंन करणे, गुन्हयाचा सामाईक इरादा, हमला करणे, अवैध्य शस्त्र बाळगणे, हद्दपार आदेशाचे उल्लघंन करणे, अधिसुचनांचे उल्लघंन करणे, दारूबंदी कायदा, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण ११ गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले आहे तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सकीय आहे.

नमुद ईसमाविरुध्द वपोनि पुनित कुलट, पोलीस ठाणे राजापेठ, अमरावती शहर. यांनी सपोआ. संजय खताळे, राजापेठ विभाग व पोउपआ परीमंडळ-२, शाम घुगे, यांचे मार्फतीने पाठविलेल्या प्रस्तावाची सपोआ गुन्हे शिवाजी बघाटे, पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर (प्रशासन), संदीप चव्हाण, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एम.पी.डी.ए. सेल चे अधिकारी सपोनि इम्रान नायकवडे, सहा. पोउपनि, अजय मिश्रा, पोलीस अंमलदार, चेतन कराडे तसेच पो.स्टे. राजापेठ येथील पोउपनि मिलींद हिवरे, पोहेकों पंकज यादव व डी.बी. पथक यांनी पुर्तता केली. सदर प्रस्तावावर मा. पोलीस आयुक्त, राकेश ओला यांनी आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी आदेश पारीत केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. राजापेठ मार्फत आदेश तामिल करून त्यास स्थानबध्दतेच्या कालावधी करीता मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दिनांक ०६/०४/२०२६ ला दाखल करण्यात आले आहे.

अमरावती शहर आयुक्तालय हद्?दीतील गुन्हेगारांची माहीती संकलीत करून त्यांचेवर राकेश ओला, पोलीस आयुक्त,यांचे आदेशाने व पोलीस निरीक्षक, संदिप चव्हाण, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली एम.पी.डी.ए.


# नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य

### ♦ आयुक्त वर्षा लड्डा यांची पत्रकार परिषदेत स्पष्ट भूमिका

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती :** महानगरपालिकेच्या नव्याने नियुक्त झालेल्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत शहराच्या विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल, अशी ठाम ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

आयुक्त वर्षा लड्डा म्हणाल्या की, शहरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध राहील. स्वच्छता, पाणीपुरवठा आणि



नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर विशेष भर दिला जाईल. नागरिकांना अधिक चांगल्या आणि दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी प्रभावी नियोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, महानगरपालिकेचे कामकाज अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यासाठी यंत्रणा अधिक मजबूत केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल आणि प्रशासन नागरिकांशी थेट संवाद ठेवून त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आयुक्त वर्षा लड्डा यांच्या या स्पष्ट आणि सकारात्मक भूमिकेमुळे अमरावती शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कौशल्य विकास केंद्राचा येत्या शुक्रवारी रोजगार मेळावा

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले कला आणि वाणिज्य महाविद्यालय, भातकुली, जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये नागपूर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येतो. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी mahaswayamed.goved .in या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६/८९८३४१९७ ९९/८६०५६५४०२५ किंवा amravatiro®ar@gmailed.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह महात्मा ज्योतिबा फुले कला आणि वाणिज्य महाविद्यालय, भातकुली जि. अमरावती येथे उपस्थित रहावे. असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# विश्रोळी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे पाणी ९ व १० एप्रिलला बंद

**अमरावती:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत (मजीप्रा) येणाऱ्या १२५ गावे विश्रोळी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामामुळे आगामी गुरुवार, दि. ९ एप्रिल आणि शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा आणि पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन मजीप्रामार्फत करण्यात आले आहे. विश्रोळी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या ६०० मिमी व्यासाच्या मुख्य पाईप लाईनवर 'अल्ट्रा सोनिक जलमापक' बसविण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच, वाढीव १०५ गावे पाणी पुरवठा योजनेच्या अशुद्ध जलवाहिनीचे कामही याच काळात पूर्ण केले जाणार आहे. या तांत्रिक कामांच्या दृष्टीने दि. ९ आणि १० एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण दिवसभर या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या गावांचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या योजनेत समावेश असलेल्या सर्व १०५ गावातील नागरिकांनी कोणत्याही प्रकारची गैरसोय टाळण्यासाठी आधीच आवश्यक पाण्याचा साठा करून ठेवावा.

# दामिनी पथकाची कुंटणखान्यावर धाड

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती :** फ्रेझरपुरा हद्दी देणाऱ्या यशोदा नगर मध्ये दामिनी पथक व भरोसा सेलच्या पथकाने धाड टाकून एका महिलेसह दोन अन्य महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या यशोदा नगर१ गल्ली क्रमांक २ मधील घरात एक स्त्री वेश्याव्यवसाय करून घेताना मिळून आली.




२ पीडित महिला ना ताब्यात या घरातून पोलिसांनी ताब्यात घेतले. एक महिला आरोपी मालकीण वा दोन पुरुष ग्राहक यांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर PITA act अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कार्यवाई भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राह्मणे व दामिनी च्या महिला कर्मचारी यांनी केली.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अर्जात दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत संधी

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती:** राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांना योजनेच्या अर्जात दुरुस्तीसाठी संधी देण्यात आली आहे. ज्या पात्र महिलांनी अर्ज भरताना कुटुंबातील सदस्यांच्या नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबत नजरचुकीने चुकीची माहिती निवडली होती, त्यांना आता ही चूक सुधारण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

योजनेच्या निकषानुसार, कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी (नियमित किंवा कंत्राटी) नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेणारा नसावा, अशी अट आहे. मात्र, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना अनेक लाभार्थ्यांकडून या पर्यायाबाबत चुकीची नोंद झाली होती. अशा लाभार्थी महिलांसाठी ऑनलाइन ई-केवायसी मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ज्या पात्र महिलांच्या अर्जामध्ये अशा तांत्रिक त्रुटी आहेत, त्यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपली माहिती ऑनलाइन पोर्टलवर जाऊन अपडेट करावी. या दुरुस्तीमुळे पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळण्यात येणारे अडथळे दूर होणार असून, कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

# विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताह - २०२६ चे आयोजन

### ♦ ८ ते १४ एप्रिल पर्यंत भरगच्च कार्यक्रम, १८ तास अभ्यास उपक्रमाने समता सप्ताहाची सुरुवात

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने ८ ते १४ एप्रिल, २०२६ दरम्यान भव्यदिव्य अशा समता सप्ताह समारोह-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. समता सप्ताहाचे उद्घाटन ८ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. विद्यापीठ परिसरातील ज्ञानस्त्रोत केंद्र सभागृहात अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांच्या हस्ते होईल. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम हे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या विषयावर व्याख्यान देतील.

**कार्यक्रमाचे स्वरुप:** या समता सप्ताहाची सुरुवात '१८ तास अभ्यास' या उपक्रमाने होणार आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वा. विद्यापीठ परिसरातील ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय) येथे या उपक्रमाला प्रारंभ होईल. दुपारी १२.०० ते दिनांक ९ एप्रिल रोजी सकाळी ६.०० वा. पर्यंत अभ्यासाची वेळ राहील.

९ एप्रिल रोजी सकाळी ७.०० वा. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान 'समता दौड' होईल. समता दौडचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते होणार असून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे, अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.




अंबादास कुलट, विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. १० एप्रिल रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त दुपारी ४.०० वा. विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र सभागृहात 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सामाजिक समतेचा विचार व कार्य' या विषयावर श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वप्निल अरसड यांचे व्याख्यान होणार आहे. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. आर.डी. सिकची, प्रा. प्रफुल्ल कडू, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांची प्रमुख्याने उपस्थिती राहणार आहे. ११ एप्रिल रोजी विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र सभागृहात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त दुपारी ४ वा. 'महात्मा फुले यांचा समतावादी दृष्टीकोन' या विषयावर कमलाताई बनमेरू महिला महाविद्यालय, लोणार येथील डॉ. ओमराज गजभिये व्याख्यान देणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे उपस्थित राहणार आहेत.

# घरकूल योजनेत घोटाळा, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पैशावर डोळा!

## एसआयटी नेमून सखोल चौकशी करण्याची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात गाजत असलेल्या घरकुल योजनतील कथित घोटाळयांनी सर्वत्र खळबळ उडवून दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना आणि इतर घरकुलांच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे वास्तव समोर येत आहे. आर्थिक लोभापाई या योजनेत अधिकारी व कर्मचाऱ्यांची खाबूगिरी वाढल्याने योजनेच्या मुख्य उद्देशालाच 'खो' दिला जात आहे. परिणामी अपात्र असलेल्या बोगस लाभार्थ्यांना लाभ देऊन खऱ्या पात्र लाभार्थ्यांना डावलण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या गंभीर प्रकाराची एसआयटी नेमून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जर केली जात आहे.





जिल्ह्यातील बेघर कुटुंबांना हक्काचे घर मिळावे म्हणून शासन विविध योजना राबवित आहे. मात्र सबंधित यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी आणि स्थानिक पातळीवरील काही सरपंच, ग्रामसेवक यांनी संगनमताने या योजनेचा बोजवारा केला आहे. अपात्र लाभार्थ्यांना लाभ देऊन खऱ्या गरजवंत पात्र लाभार्थ्यांना डावलल्याचे गंभीर प्रकार उघड होत आहेत. यात प्रामुख्याने स्थानिक पातळीवर जाणीवपूर्वक कागदपत्रात फेरफार करण्यात आल्याचे दिसून येत आहे तर सबंधित कागदपत्राची कुठलीही पडताळणी न करता लाच घेऊन अपात्र लाभार्थ्यांना पात्र ठरवण्यात आले असल्याची माहिती हाती आली आहे. या गंभीर प्रकरणात अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी सिटीन्यूज सुपरफास्ट सातत्याने पाठपुरावा करत आहे. मात्र सबंधित प्रशासन अजूनही मूग गिळून गप्प बसले आहे. त्यामुळे घरकुल घोटाळ्याचे पाणी खोलवर रुजले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या बाबत काही सामाजिक संघटना आता आक्रमक भूमिका घेणार असून याची वरिष्ठ स्तरावर तक्रार करण्यात येणार असल्याची माहिती एका सामाजिक कार्यकर्त्याने दिली आहे.

बेघर, अल्प व अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांना स्वतःचे घर मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आलेली घरकुल योजना रिसोड तालुक्यात गंभीर अनियमितता आणि भ्रष्ट कारभाराच्या विळख्यात सापडल्याचे चित्र आहे. कागदोपत्री गरीबांसाठी असलेली ही योजना प्रत्यक्षात पैशांची देवाणघेवाण झाल्याशिवाय पुढे सरकत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

तालुक्यात घरकुलांची मोठ्या प्रमाणात कामे सुरू असली, तरी त्यामागे पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप होत आहे. लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते मंजूर करून देण्यासाठी ५ ते १० हजार रुपये घेतले जात असल्याच्या तक्रारी आहेत. विशेष म्हणजे, ज्यांनी स्वतःच्या कष्टाने घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे, त्यांनाही हप्ते मिळवण्यासाठी पैसे द्यावे लागत असल्याचे सांगितले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही प्रकरणांमध्ये घरकुलाचे बांधकाम न करताही १० ते २० हजार रुपये घेऊन हप्ते सोडले जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे योजना ही गरजूंसाठी नसून 'पैसे देणाऱ्यांसाठी' असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तसेच, बोगस कागदपत्रांच्या आधारे लाभार्थी निवड केल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. ५ हजार ते २५ हजार रुपये घेऊन अपात्रांना पात्र ठरवले जात असल्याने, खरे गरजू नागरिक मात्र योजनेपासून वंचित राहत आहेत. 'गरीब अपात्र आणि पैसेवाले पात्र' अशी उलटी परिस्थिती निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे घरकुल योजना ही गरजूंना आधार देणारी योजना न राहता काहींच्या कमाईचे साधन बनल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. गावागावातून नाराजी व्यक्त होत असून, संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.




## थोडक्यात

### सानिका राऊतचे IIT-JAM परीक्षेत यश

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड येथील स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयातील बी. एस्सी. (विज्ञान शाखा) मधील विद्यार्थिनी कु. सानिका राऊत हिने भौतिकशास्त्र विषयात प्रतिष्टित IIT-JAM (Indian Institute of Technology Joint Admission Test for M.S. plus Ph.D.) प्रवेश परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. तिच्या या उल्लेखनीय मथामुळे महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल झाले आहे.



सानिका राऊत हिने सातत्यपूर्ण अभ्यास, प्रबळ इच्छाशक्ती आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री बाबारावजी पाटील, सचिव मा.अमित पाटील, माजी प्राच्यार्य तथा कार्यकारी अधिकारी डॉ. जे. बी. देव्हडे तसेच प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. जितेंद्र बोरसे तसेच प्रा. श्री. निखिल उंबारकर, महाविद्यालयाचे प्राध्यापकवर्ग यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून भविष्यातही ती उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. महाविद्यालय परिवारातर्फे कु. सानिका राऊत हिला पुढील

### य.च.महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागांतर्गत पोस्टर प्रेझेंटेशन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागांतर्गत पोस्टर प्रेझेंटेशनचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.ए. भाग १, २ आणि ३ च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०३ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले होते. अर्थशास्त्र विभागाअंतर्गत आयोजित पोस्टर प्रेझेंटेशनचे उद्घघाटन महाविद्यालयाचे कला आणि विज्ञान शाखाप्रमुख डॉ. शरद वाघोळे, संजीव इंगळे यांनी फीत कापून केले. या उदघाटन प्रसंगी मनोज कडू, डॉ. मधुकर ताकतोडे, डॉ. देविदास भगत, डॉ. साहेबराव पवार, डॉ.प्रमोद देवके, डॉ. श्रीकांत रासेकर, प्रा. नत्थु पडवाल, डॉ किशोर वानखडे, डॉ. जी. पी. खंडारे डॉ.अंजुम खान, प्रा. सय्यद उपस्थित होते. उदघाटनानंतर डॉ. शरद वाघोळे, डॉ.संजीव इंगळे आणि सर्व सहकारी प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांनी अर्थशास्त्र विषयांच्या अभ्यासक्रमावर आधारित तयार केलेल्या सर्वच पोस्टरची पाहणी करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या विषया व्यतिरिक्त आणखी कोणकोणत्या विषयावर पोस्टरचे आणखी चांगले सादरीकरण कसे करता येईल याविषयी माहिती दिली. डॉ. मधुकर ताकतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागअंतर्गत विद्यार्थ्यांनी लोकसंख्या आणि स्थलांतराचे प्रकार, भारतातील महान आर्थिक विचारवंत, नागरीकरण अर्थ आणि कारणे, लोकसंख्या वाढ, लोकसंख्येचे स्थलांतरण, शहरीकरण अर्थ आणि कारणे, लोकसंख्या विस्फोट, अशा विविध विषयावर बी.ए. भाग तीन मधून आदित्य चिपडे, निखिल गजभार, आदित्य भगत, निलेश चक्रनारायण, अनिकेत खंडारे, कु.भगवती कांबळे, शिवानी मोरे, प्रतीक्षा गिरी, रूपाली खडीकर, शिवानी मोरे, भक्ती सुर्वे, गौरी ठाकूर, लाजरी मिटकरी, प्रज्ञा भगत, निकिता भोयर अशा एकूण १५ विद्यार्थ्यांनी आपल्या पोस्टरचे उत्कृष्टपणे सादरीकरण केले. पोस्टर प्रेझेंटेशन कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला कला शाखेतील आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पोलीस विभाग अचंबित, पि.एस.आय. सुनील गिरी निलंबित !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





वाशीम शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पीएसआय सुनील गिरी यांच्यावर आलेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत त्याचं थेट निलंबन करण्यात आलं आहे. अनेक दिवसांपासून त्यांच्या कार्यपद्धतीवर सर्व स्तरांवर नाराजी व्यक्त केली जात होती. अखेर ४ मार्च रोजी पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी त्यांच्यावर ही कारवाई केली आहे. या कारवाईमुळे गिरी यांच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून त्यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र मंगरूळपीरचे एसडीपीओ यांच्या अहवालात काय निष्पन्न होते. हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या या कारवाईची जिल्ह्यात जोरदार चर्चा रंगली आहे.

वाशीम शहर पोलीस ठाण्यात रुजू झाल्यापासून पीएसआय सुनील गिरी हे सतत वादाच्या भोवऱ्यात अडकलेले दिसले. अंगाने धडधाकट, एखाद्या बॉडीबिल्डर सारखं शरीर, डोळ्यावर काळा गॉगल आणि अंगावर खाकी वर्दी हा त्यांचा नेहमीचा अंदाज. मात्र, या 'दबंग' लूकसोबतच त्यांनी अनेकदा केलेली स्टंटबाजी आणि दिखाऊ वागणूक यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलिन होऊ लागली होती. एखाद्या सभेत बंदोबस्त दरम्यान कर्तव्य बजावण्याऐवजी इंस्टाग्रामवर रील तयार करून स्टाईल मारणे, लोकांसमोर ॲक्शन हिरोसारखी वागणूक देणे, आणि सोशल मीडियावर इमेज वाढवण्याच्या नादात नियमांची पायमल्ली या सगळ्यामुळे गिरी नेहमीच वादात सापडले. त्यांच्या कामाच्या पद्धतीबद्दल सर्वसामान्य नागरिकांनी अनेक वेळा नाराजी देखील व्यक्त केली. पोलीस अधिकारी म्हणजे शिस्त, जबाबदारी आणि विश्वासाचं प्रतीक असतं. पण इथे मात्र गिरी यांनी वेगळीच ओळख तयार निर्माण करून आतंक करण्यास सुरुवात केली होती. तपासा दरम्यान किरकोळ प्रकरणात आरोपींना उचलून आणणे, आवश्यकता नसतांना तासंतास त्यांना ठाण्यात बसून ठेवणे, उलट सुलट प्रश्न विचारून समोरच्या व्यक्तीला मानसिक आणि आर्थिक त्रास देणे. असे अनेक कारनामे पीएसआय गिरींचे जग जाहीर झाले होते. आणि तेथूनच गिरी विरुद्ध तक्रारीचे ढीग लागू लागले. दरम्यान पीएसआय गिरी यांच्याविरोधात प्राप्त झालेल्या काही अत्यंत गंभीर तक्रारींची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारेंनी त्याच्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई केली आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी मंगरूळपीर येथील एसडीपीओ यांच्याकडे सोपविण्यात आली असून चौकशीनंतरच आरोपांमध्ये किती तथ्य आहे. हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान, अचानक झालेल्या या कारवाईमुळे वाशीम पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. गिरी यांनी आर्थिक फायद्यासाठी अनेक प्रकरणात गैरप्रकार केल्याची वाशीम शहर ठाण्यात दबक्यात आवाजात चर्चा असून त्यांच्या चौकशीतून अनेक प्रकरण समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष मंगरूळपीर एसडीपीओंच्या अहवालाकडे लागले आहे.

### पाच लाखांची मागणी, ८० हजारांत 'सेटलमेंट' गिरींचा आणखी एक कारनामा चर्चेत...

काही दिवसांपूर्वी वाशीम शहरातून एका युवकाला पीएसआय गिरी यांनी दुपारी ताब्यात घेऊन शहर पोलीस ठाण्यात आणले. संबंधित युवकाच्या नावावर एका बँक खात्यात मोठी रक्कम जमा झाल्याचे सांगत त्याची चौकशी करण्यात आली. मात्र हे खाते आपण वापरत नसल्याचे युवकाने सांगितले. तरीही या प्रकरणात मोठा गुन्हा दाखल करून अटक केली जाईल, अशी भीती गिरी यांनी युवकाला दाखवली. घाबरलेल्या युवकाने आपल्या नातेवाईकांना शहर पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. नातेवाईकांनी युवकाला सोडण्याची विनंती केली असता, गिरी यांनी तब्बल ५ लाख रुपयांची मागणी केल्याची चर्चा आहे. शेवटी हे प्रकरण ८० हजार रुपयांत मिटल्याची माहिती प्राप्त झाली असून त्यानंतर रात्री सुमारे ११ वाजता युवकाला सुखरूप सोडण्यात आले. गिरींचा हा कारनामा देखील चांगलाच चर्चेचा ठरला होतं.

# मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे.



काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

# वाशीम येथील फुले मार्केट नव्हे 'फेल मार्केट'!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.

येथील दुकानदारांकडून कर व भाडे न.प.ला भरणापोटी काही रक्कम या संकुलाच्या देखरेखीसाठी नियुक्त केलेल्या विकासकाला मिळत असते हे येथे उल्लेखनिय. माहितीच्या अधिकारान्वये या संकुलाबाबतच्या महत्वपुर्ण कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे अमरावती येथील विभागीय कार्यालयात जमा असल्याचे सांगण्यात आले. याबाबत अधिक वृत्त असे की, लघु व्यवसायीकांच्या व्यवसायासाठी येथील रविवार बाजारात नगर परिषदेच्या वतीने महात्मा फुले संकुल उभारण्यात आले आहे. व्यापारीक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले हे संकुल न.प.पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या ठिसूळ नियोजनामुळे पुर्णत: 'फेल मार्केट' म्हणून कुप्रसिध्द झाले आहे. सगळीकडे घाण, दुर्गंधी, अस्वच्छता या चक्रात सापडलेल्या या संकुलाचा वापर आजघडीला गदुल्ले, नशेबाज, पत्तेबाज, अवैध दारुविक्री, अवैध वरली मटक्यासाठी उपयोगात येत आहे.



त्यामुळे या डोकेदुखीला संकुलातील लघुव्यवसायीकांना सामोरे जावे लागत आहे. संकुलात भाजीपाला विक्रेत्यांसाठी नगर परिषदेने गाळे तयार केले आहेत. मात्र भाजीपाला विक्रेते या गाळ्यात बसण्याऐवजी खुल्या जागेतच भाजीपाला विक्री करत आहेत. त्यामुळे मोकळ्या असलेल्या या जागेचा वापर रात्रीच्या वेळेस हागणदारीसाठी व दिवसा मुत्रीघर म्हणून होत आहे. संकुलात कामासाठी येणारे नागरीक दुर्गंधीमुळे नाकाला रुमाल लावूनच येतात. येथील वातावरणामुळे महिला वर्ग तर येथे येण्यासही धजावत नाहीत. वाशीम मतदार संघाला लखन मलीक यांच्या रुपाने भारदस्त व निस्वार्थी आमदार मिळाले आहेत. येथील लघु व्यवसायीक व्यापाऱ्यांनी संकुलातील परिस्थीतीबाबत सुधारणा होण्यासाठी आमदारांना सुध्दा निवेदने दिली आहेत. मात्र त्यांच्या आमदारकीचाही प्रभावही संकुलाची सुधारणा होण्यासाठी कुचकामी ठरत आहे. त्यामुळे नगर परिषदेसोबतच लोकप्रतिनिधी बाबतही येथील लघु व्यवसायीकांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.

# मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे. शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी.





मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, कारंजा रोड, आंबेडकर चौक, बसस्थानक चौक व मानोरा रोड व, पोस्ट ऑफिस रोड इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे तसेच या तील अनेक भागात मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला असतो त्यामुळे रहदारिस मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे.

त्यामुळे शहरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अतिशय आवश्यक आहे. अन्यथा शहरातील मोकाट गुरांच्या

### अपघाताला आमंत्रण

अडचणी मुळे होणारे अपघात व अन्य गोष्टींची नुकसानी ची जबाबदारी नगर पालिकेने घेऊन त्या बाबत अधिकृत पत्रक काढावे तरी मुख्याधिकारी साहेब यांना विनंती की, त्यांनी पालिका प्रशासन मार्फत आवश्यक कार्यवाही व व्यवस्था करून शहरातील मोकाट गुरांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अन्यथा भाजपचा नेतृत्वाखाली नागरिकांना सोबत घेऊन नगर पालिका मुख्याधिकारी यांच्या कक्षाचे प्रवेशद्वारा ला मोकाट गुरांच्या शेणाने सारवण करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे.

# शहरातील नाल्यांची साफसफाई करण्यात यावी

● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

पावसाळ्यापुर्वी शहरातील नाल्यांची साफसफाई करण्यात आली तर पुराच्या धोक्यापासून नाल्याकाठील रहिवाशांचा बचाव होतो. मात्र पालिकेने अद्यापही शहरातील नाल्यांची साफसफाई करण्याची मोहिम हाती घेतली नसल्याने बालाजी मंदिर मागील भाग, डोहर पुरा, गवळीपुरा, गोंदेश्वर, विटाळी तलाव आदि परिसरातील नागरिकांनी नाले साफसफाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, नाली सफाई नसल्याने नाल्या गटारगंगा बनल्या असून शहरात नाली



भवताल जिकडे तिकडे चौहीकडे घाणच घाण पसरली आहे तर नगर पालिका ही भ्रष्टाचाराने आखडली असून नाली सफाई रखडली आहे. तर मान्सुन पुर्व पावसाने हजेरी लावल्याने शहरात रखडलेली नाली सफाई आता केव्हा करणार असा सवाल उपस्थित होतो. धुवादार पावसाने शहरात दाणादाण केली असून नाले सफाई रखडल्यामुळे घाणचघाण पसरली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि.७एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कांद्याचे दर कोसळले ; पिकाचा उत्पादन खर्चही निघेना !

प्रतिनिधी ७ एप्रिल

**♦ चांगल्या प्रतीच्या कांद्यालाही केवळ ५ ते ७ रुपये प्रति किलो दर**



**खामगाव :** मागच्या वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा काढणीच्या हंगामातच कांद्याचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. एकेकाळी आर्थिकदृष्ट्या बळ देणाऱ्या कांद्यामुळे आता शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या असून, उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

बाजारात सध्या चांगल्या दर्जाच्या कांद्याला केवळ ५ ते ७ रुपये प्रति किलो इतका अत्यल्प दर मिळत आहे. कांद्याची आवक वाढल्याचे कारण पुढे करून व्यापाऱ्यांकडून गैरफायदा घेतला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. खासगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात खरेदी सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जिल्ह्यात काही खासगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचे आरोप होत आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कांदा विक्रीदरम्यान व्यापारी ४० ते४५किलोच्या प्रत्येक गोणीवर अतिरिक्त एक किलो घट लावत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षेपेक्षा कमी मोबदला मिळत आहे. या प्रकाराची दखल घेऊन स्थानिक कृषी अधिकारी व प्रशासनाने शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने कारवाई करावी, तसेच आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त्त केली जात आहे.कांदा उत्पादक शेतक-यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, कांद्याचे पीक घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. यामध्ये मुख्यत्वे बियाणे, खते, औषधी, मजुरी यासाठी मोठा खर्च होतो. दर्जेदार बियाण्यांचे वाढलेले आहेत. पिकाच्या जोमदार वाढीसाठी खतांचा व कीटकनाशकांचा अवाढव्य खर्च होतो, तसेच कांदा काढणी, कापणी आणि वाहतुकीसाठी लागणारी मजुरी गेल्या काही दिवसांत दुप्पट झाली आहे. या सर्व खर्चाचा ताळेबंद मांडल्यास, सध्या मिळणारा ५ ते ७ रुपयांचा दर म्हणजे शेतक-यांच्या हातात निव्वळ तोटा देणारा आहे.बाजारात सध्या कांद्याला हवा तसा उठाव नसल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे; मात्र दुसरीकडे किरकोळ बाजारात ग्राहक मात्र १५ ते २० रुपये दराने कांदा खरेदी करत आहेत. यातील नफा मधल्या साखळीतील व्यापारी आणि दलाल लाटत असून, मूळ उत्पादक शेतकरी मात्र देशोधडीला लागला आहे.

> ◆व्यापारी ४०-४५ किलोच्या गोणीवर एका किलोची घट लावत आहेत. यामुळे वास्तविक उत्पादनाची किंमत मिळत नसल्यामुळे नुकसान होते. प्रशासनाने यावर तातडीने लक्ष देऊन शेतकऱ्यांचे नुकसान थांबवावे.
>
> **ज्ञानेश्वर टिकार,** शेतकरी

## भरधाव मोटारसायकलची धडक; युवक जखमी, गुन्हा दाखल

प्रतिनिधी ७ एप्रिल

**खामगाव :** खामगाव पिंपलगाव राजा ते जळका भडंग रोडवर भरधाव आणि निष्काळजीपणे मोटारसायकल चालवल्यामुळे झालेल्या अपघातात एक युवक जखमी झाल्याची घटना सायंकाळच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार,या प्रकरणी फिर्यादी दादाराव सुरेश शिंदे (१८) रा. उटी ता. मेहकर जि. बुलढाणा यांनी तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, फिर्यादी हे आपल्या वाहनाने पिं. राजा ते जळका भडंग मार्गावरून जात असताना आरोपीने त्याच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटारसायकल क्रमांक एमएच २८ बीबाय ६०३२ ही अतिवेगाने चालवून फिर्यादीच्या वाहनास जोरदार धडक दिली. तक्रारीवरून पिंपळगाव राजा पो.स्टे. मध्ये भा.न्या. सं. कलम २८१, १२५, १२५ (अ), ३२४ (२) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# खामगावात ईद मिलन सोहळा उत्साहात

**♦ सामाजिक ऐक्य, सलोखा, बंधुत्व व एकतेचा संदेश**




प्रतिनिधी ७ एप्रिल

**खामगाव :** सामाजिक ऐक्य, बंधुत्व आणि परस्पर स्नेह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित ईद मिलन सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जमात-ए-इस्लामी हिंद, एसआयओ, महिला विंग व जीआयओ यांच्या संयुक्त विद्यमाने एका हॉटेलमध्ये हा सोहळा पार पडला.अध्यक्षस्थानी जमात-ए-इस्लामी हिंद नाशिकचे सचिव वाजिद अली खान होते. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, अंजुमन मुफिद-उल-इस्लामचे अध्यक्ष डॉ. वकार उल हक खान, संजय शिनगारे, स्वप्नील ठाकरे, प्राचार्य डॉ. धनंजय तळवलकर, डॉ. प्रसाद थिटे, सतीशआप्पा दुडे, शेखर पुरोहित, नरेंद्र वानखेडे, मुन्ना पुरवार, विजय उगले, राजकुमारी तेजेंद्रसिंग चौहान, हर्षा नागाडे, श्रुती पतंगे, सलुजा कौर आदी उपस्थित होते. हाफिज अतीक साहिब यांच्या कुराण पठणाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. सोहेल फुरकान यांनी मराठी भाषांतर सादर केले. संचालन सोहेल फुरकान, तर आभार जफर ओबैद अन्सारी यांनी मानले.

# कुपनलिका दुरुस्त करण्याची मागणी

प्रतिनिधी ७ एप्रिल

**मलकापूर :** मलकापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. शहराचा पाणीपुरवठा थेट १२ दिवसांवर येऊन ठेपला असून, कडक उन्हात पाण्यासाठी नागरिकांना वणवण फिरावे लागत आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन शहरातील बंद पडलेल्या कूपनलिका (बोअरवेल) दुरुस्त कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

**परिस्थिती गंभीर, नियोजनाचा अभाव**

सध्या वातावरणातील तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने पाण्याची मागणीही वाढली आहे. मात्र, नगरपरिषद प्रशासनाचे पाणीपुरवठ्याचे नियोजन पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र दिसत आहे. तब्बल १२ दिवसांनंतर पाणी येत असल्याने गृहिणींचे बजेट आणि दैनंदिन वेळापत्रक कोलमडले आहे. खासगी टँकरसाठी नागरिकांना खिसा रिकामा



करावा लागत आहे.

**कूपनलिकांची दुरुस्ती अनिवार्य**

शहरातील विविध प्रभागांमध्ये असलेल्या सार्वजनिक कूपनलिका सध्या अनेक ठिकाणी बंद अवस्थेत आहेत. जर प्रशासनाने या कूपनलिकांची तातडीने दुरुस्ती केली, तर मुख्य पाणीपुरवठ्यावरचा ताण कमी होऊ शकतो आणि नागरिकांना घरगुती वापरासाठी पाणी उपलब्ध होऊ शकते. मात्र, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिक सांगत आहेत.

# पीएम सन्मान चा लाभ मिळेना ; संतप्त शेतकऱ्यांचे अर्धनग्न डफडे आंदोलन

प्रतिनिधी ७ एप्रिल

**♦ मेहकरमध्ये प्रलंबित मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी आंदोलन केले**

**मेहकर :** पीएम किसान सन्मान योजनेचा लाभ मिळत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी सोमवारी ६ एप्रिल रोजी मेहकर येथे कृषी विभागाच्या कार्यपद्धतीविरोधात अर्धनग्न डफडे आंदोलन छेडत प्रशासनाला जाब विचारला. गजानन बोरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाची शहरात चर्चा होती. आंदोलनकर्त्यांनी अंगावर बेशरम व लिंबाच्या पानांचा वेष परिधान करून अर्धनग्न अवस्थेत, डफडे वाजवत घोषणाबाजी करत कृषी विभागाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढला. जिजाऊ चौक मार्गे निघालेल्या या मोर्चात शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, तालुका कृषी अधिकारी वारंवार कार्यालयात अनुपस्थित असतात, तर कर्मचारीही असहकार्याची भूमिका घेतात. अनेक अल्पभूधारक व गरजू शेतकऱ्यांनी शेतकरी सन्मान योजनेसाठी अर्ज करूनही वर्षानुवर्षे केवळ कागदी पूर्ततेच्या नावाखाली त्यांना फिरवले जात आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना स्थानिक पातळीवर प्रभावीपणे राबवल्या जात नसल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. आंदोलनकर्त्यांनी अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर ठिय्या देत जोरदार घोषणाबाजी केली. अखेर प्रशासनाने आंदोलनाची गंभीर दखल घेत ११५ शेतकरी लाभार्थ्यांची प्रलंबित प्रकरणे दुरुस्त करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# शेगाव आठवडी बाजारात वाद

**♦ तरुणास मारहाण, एकाविरुद्ध गुन्हा दाखल**

प्रतिनिधी ७ एप्रिल

**शेगांव :** शेगाव येथील आठवडी बाजार परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणास मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी शेगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन आनंदा मीरकुटे (वय ३५, रा. मोदी नगर, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा) हे सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास आठवडी बाजार परिसरात होते. त्यावेळी आरोपी गणेश श्रीकृष्ण मुडोकार (रा. जगदंबा नगर, शेगाव) याने फिर्यादीस 'माझ्यासोबत गाडीवर चल' असे सांगितले. मात्र, फिर्यादीने काम असल्याचे सांगत नकार दिल्याने आरोपी संतप्त झाला. यानंतर आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करत त्याच्या अंगावर पाणी टाकले व मारहाण केली. तसेच, फिर्यादीच्या डाव्या हाताच्या बोटाला चावा घेतल्याचा आरोप आहे. धमकीही देण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलीस ठाण्यात कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घड्डे करीत आहेत

# पं.स. कारभाराविरुध्द ७ ग्रा.पं. कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण

प्रतिनिधी ७ एप्रिल



**सोनाळा :** गाव खेड्यात तुटपुंज्या पगारावर पूर्ण वेळ सेवा देवून प्रशासनाचा व ग्रामिण जनतेचा दुवा ठरलेले ग्रामपंचायत कर्मचारी संकट मोचक आहे. त्यांचेमुळे गावोगावी पंचायतराजचा या डौलारा उभा आहे. मात्र त्यांना सेवेचा वनवास ठेवून पंचायत समिती व जिल्हा परिषदेने बेधुंद कारभार चालविला आहे. उपरोक्त कारभारामुळे संग्रामपूर तालुक्यातील ७ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी पंस समोर ,६ एप्रिल पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सप्टेंबर २०२० ते मार्च २०२२ या कालावधी मधील फरकाची आमरण उपोषण रक्कम वेळोवेळी मागणी नंतर जमा झाली नाही. पंचायत समिती व जिल्हा परिषद मधील प्रशासनामध्ये समन्वय नसल्याने कर्मचाऱ्यांना आंदोलन करण्याची वेळ आली आहे. कुटुंबाच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी कर्मचाऱ्यांचा अनेक वर्षापासून पाठपुरावा सुरू आहे. मात्र जिल्हा परिषद प्रशासन व पंचायत समितीच्या अहवालाकडे त्रुट्यांच्या नावाखाली बोट दाखवून कर्मचाऱ्यांना हक्काच्या पैशासाठी वंचित ठेवले. या कारभाराला वैतागून ग्रामपंचायत कर्मचारी युनियन शाखा संग्रामपूरने २४ मार्चला मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना फरकाची रक्कम तातडीने अदा करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. तरीही प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. म्हणून ग्राप कर्मचारी युनियनचे तालुकाध्यक्ष श्रीराम निमकर्डे, तालुका सचिव संजय भिसे, योगेंद्र थोरात, प्रवीण कराडे, गजानन मोरखडे, शिवाजी कासदेकर, श्याम खंडेतोड यांनी संग्रामपूर पंचायत समिती समोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. ०७ एप्रिलपासून कर्मचारी सह कुटुंब या आंदोलनात सहभागी होणार आहेत. यामुळे हे आंदोलन चिघळण्याची शक्यता यावेळी व्यक्त होत आहे.

## यूडीआयडी कार्ड अनिवार्य; अन्यथा अर्थसाहाय्य थांबणार!

प्रतिनिधी ७ एप्रिल

**जळगाव जामोद :** शासनाच्या विशेष सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या दरमहा २,५००रुपयांच्या अर्थसाहाय्यासाठी आधार संलग्न असलेले युनिक डिसॅबिलिटी आयडी (युडीआयडी) कार्ड सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या २७मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार हा नियम लागू करण्यात आला आहे. तहसीलदार पवन पाटील यांनी लाभार्थ्यांना आवाहन केले आहे की, आधार संलग्न युडीआयडभ कार्ड, अद्ययावत आधार कार्ड व बँक पासबुकच्या छायांकित प्रती तातडीने तहसील कार्यालयात जमा कराव्यात. सध्या लाभार्थ्यांच्या माहितीचे डीबीटी पोर्टलवर अद्ययावतीकरण सुरू असून, आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

# गॅस टंचाईचा सामान्य जनतेला फटका

प्रतिनिधी ७ एप्रिल

**♦ वंचितचा एल्गार शासना विरोधात घोषणा**

**खामगाव :** राज्यात सुरु असलेल्या गॅस टंचाई चा फटका बसू लागला आहे,निर्माण झालेली गॅस टंचाई ही दूर करावी या साठी वचित बहुजन आघाडी च्या वतीने एल्गार पुकारण्यात आला आहे. या साठी ६ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर वंचित च्या वतीनी धरणे आंदोलन करण्यात आले. या वेळी घोषणा बाजी करत उपविभागीय कार्यालयाला धडक दिली व निवेदन सादर केले.

गैस टंचाईचा फटका सामान्य जनतेला बसत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त होऊ लागला आहे त्यामुळेच वंचित बहुजन आघाडीने आंदोलन पुकारले आहे. सिलेंडर मिळविण्यासाठी तासान



तास रांगेमध्ये उभे राहावे लागत आहे त्यामुळे काही नागरिकांचा मृत्यूही झाला आहे. यामध्ये अकोला येथील शंकरराव शिरसाट यांचा समावेश आहे. गैस सिलेंडर साठी होणारी कृत्रिम टंचाई दूर करावी गैस सिलेंडरचा काळाबाजार रोखावा २५ दिवसानंतर गॅस मिळेल ही अट रद्द करावी वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्या यावं इतर अनेक मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन सुरु केले आहे या आंदोलना मध्ये वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा अध्यक्ष देवा हिवराळे, शांताराम पाटेखेडे, विशाखा सावंग, गौतम नाईक, आकाश सरदार, संघपाल जाधव या व इत्तर पदाधिकाऱ्यांनाचा समावेश होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट

संमिश्र

# फसव्या शेतकरी कर्जमाफी योजनेचे नाव बदलण्यात यावे

प्रतिनिधी ७ एप्रिल

**♦ क्रांतिकारी शेतकरी संघटना**




**मुर्तिजापूर :** क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा संघटक राहुल वानखडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. विधानसभा निवडणूक प्रचारात मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्याचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते. परंतु त्यांना कर्जमाफीचा विसर पडला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात घाईघाईने दोन लाख रुपये कर्जमाफ केल्याची फसवी घोषणा केली. या कर्जमाफीला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना असे नाव देण्यात आले परंतु शेतकऱ्यांना फसवी कर्जमाफी योजना देऊन महापुरुषांचे कार्य व त्यांच्या नावाचा अपमान होत आहे त्यामुळे या फसवी कर्जमाफी योजनेचे महापुरुषाचे नाव बदलून शेतकऱ्यांची खोटे बोलून केंद्रातआणि सत्तेत आलेल्या भाजपाने दुसरे नाव द्यावे अशी मागणी केली. निवेदन देताना राहुल वानखडे, शुभम जवंजाळ, रामदास भगत, प्रवीण खोत, शंभू पाचोळे, रियाज भाई, संतोष मुद्राकार, नंदकिशोर भवानी, ज्ञानेश्वर शेवतकर, तुळशीराम गंजाळे, वंचित बहुजन आघाडीचे संजय नाईक यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# पाटील समाजाच्या 'योगायोग' पुस्तिकेचे प्रकाशन



प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** पाटील समाजाच्या योगायोग वधू वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. स्थानिक हॉटेल हर्षवर्धन येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर होते. समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी संपादित केलेल्या या पुस्तिकेत सर्वच संवर्गातील उपवर मुला मुलींची रंगीत फोटोसह माहिती देण्यात आलेली आहे. याप्रसंगी अशोकराव अमानकर, प्रदीप खाडे, सुनील जानोरकर, राजेंद्र मोहोकार, विनायकराव शेळके, शरद वानखडे , पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बाहाकर, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, संघटिका सरिता वाकोडे, अर्चना पाटील, अशोक पटोकार, देवराव हागे पाटील, सुभाष म्हैसणे, रामेश्वर सपकाळ, सुरेश गाढे पाटील डॉ. दिलीपराव मानकर, सुभाष पात्रीकर यांनी मनोगत व्यक्त केले. आगामी काळात महिलांच्या समस्या सोडवण्यावर विशेष कक्ष स्थापन केला जाईल.

# गॅस सिलेंडर संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे धरणे

प्रतिनिधी ७ एप्रिल




**अकोट :** गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून, या ज्वलंत प्रश्नावर आज वंचित बहुजन आघाडी अकोट तालुक्याच्या वतीने तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी महिला आघाडीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात चक्क चुली पेटवून ,त्यावर 'भाकर-ठेचा' बनवून प्रशासनाच्या धोरणांचा उग्र निषेध केला. ''नरेंद्र, कब मिलेंगा सिलेंडर''अशा घोषणांनी यावेळी परिसर दणाणून गेला होता. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते बाळासाहेब आंबेडकर यांनी वर्तवलेली गॅस टंचाईची भीती आज खरी ठरली असून, सर्वसामान्य जनतेला रॉकेल आणि लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे, अशी टीका यावेळी करण्यात आली. गॅसचा काळाबाजार थांबावावा , ५ ते ७ हजारांना मिळणारे अवैध सिलेंडर रोखावेत आणि -ई केवायसीच्या नावाखाली नागरिकांची अडवणूक थांबावी, अशा मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचि रोशन पुंडकर, प्र. प्रमुख स्वप्निल सरकटे, सुरेंद्र औईबे, निलेश झाडे, लता कांबळे , प्रदीप वानखडे,धीरज शिरसाट, रोहित धांडे, राहुल इंगळे, मुस्ताक पटेल, दिनेश धांडे, अशीष रायबोले,अमन गवई, भाऊराव धांडे, संजय पुंडकर, डॉ. मानकर,माणिक इंगळे, मंगेश कांबळे, अर्चना वानखडे, नितीन वानखडे, केशव बिलबिले, अब्राल पठाण, नितीन वाघ, गोपाल ढोरे,कांतिराम गहले,अनिता टोपकर,मंगला खांडेकर, कल्पना भटकर,राजू भटकर,विकी धांडे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात पहिल्या 'जेन–झी' पोस्ट ऑफिसचे थाटात उद्घाटन

■ डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरात झाली सुविधा सुरु ■ टपाल विभागाचे मोफत वाय-फाय, कॅफेटेरिया आणि म्युझिक रूम

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** भारतीय टपाल विभाग आता कात टाकत असून तरुणाईशी जोडले जाण्यासाठी सज्ज झाला आहे.

आज अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, शहरातील पहिल्या 'जेन झी' पोस्ट ऑफिसचे उद्घाटन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथील कृषिनगर डाक कार्यालयात संपन्न झाले.

विकसित भारताच्या दिशेने पाऊल टाकत, अकोला डाक विभागाने आज एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या विशेष पोस्ट ऑफिसचे उद्घाटन पीकेव्हीचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या



हस्ते पार पडले. यावेळी नागपूर डाक सेवा संचालक डॉ. सुधीर जाखेरे आणि कृषी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. हे पोस्ट ऑफिस केवळ टपाल देवाणघेवाणीचे केंद्र नसून, ते तरुणांच्या सर्जनशीलतेला वाव देणारे हब ठरणार आहे. विशेष म्हणजे, या कार्यालयाची अंतर्गत सजावट आणि भित्तिचित्रे स्वतः कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी तयार केली आहेत. या कार्यालयात प्रवेश करताच तुम्हाला पारंपारिक सरकारी कार्यालयाचा अनुभव न येता एखाद्या आधुनिक कॅफेचा अनुभव येईल. संपूर्ण परिसर 'मोफत वाय-फाय' झोन आहे. येथे कॅफेटेरिया-शैलीतील बैठक व्यवस्था आणि एक छोटे वाचनालय आहे. गाणी ऐकण्यासाठी खास 'वातानुकूलित संगीत कक्ष' तयार करण्यात आला आहे. ई-कॉमर्स



आणि लॉजिस्टिक्सची माहिती देण्यासाठी विशेष विभाग कार्यान्वित केला गेला आहे. क्यूआर-आधारित सेवा वितरण आणि आधार अपडेटची सोय केल्या गेली आहे.

या सोहळ्याला प्रवर डाकपाल संगीता रत्तेसार, डाकघर उपअधिक्षक नरेश शिंदे, डाकघर सहाय्यक अधिक्षक गणेश सोनोने, वाशिमचे सहाय्यक अधिक्षक प्रवीण चंद्र पंत, वाशिमचे डाक निरिक्षक निलेश वायाळ, अकोल्याचे डाक निरिक्षक किरण विश्वकर्मा यांच्यासह डाक विभागाचे अनेक अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबई, नागपूर आणि दिल्लीनंतर आता अकोल्यातही ही सेवा सुरू झाल्याने टपाल विभाग खऱ्या अर्थाने डिजिटल युगात दाखल झाला आहे, असे मत अकोलेकरांनी व्यक्त केले आहे.

# सोनटक्के प्लॉटमध्ये आपसात भिडले दोन गट

हाणामारीत पाईप व तलवारीचा सर्रास वापर तिघे जखमी तर एक गंभीर

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या सोनटक्के प्लॉटमध्ये सोमवारी उशिरा रात्री एकाच समुदायातील दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची गंभीर घटना घडली अतिक्रमणास घेऊन तसेच जुन्या वादातून हे दोन्ही गट आपसात भिडल्याची माहिती समोर येत आहे या घटनेत तिघे जखमी झाले अजून त्यापैकी एका जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे प्राप्त माहितीनुसार दोन्ही गटांमध्ये आधीपासून वाद होता सोमवारी रात्री हा वाद पुन्हा पेटल्याने परिस्थिती चिघळली त्याचे रूपांतर मोठ्या हाणामारीत झाले. अतिक्रमणाच्या वादातून हा हल्ला झाला असून एकमेकांवर पाईप व तलवारीने वार करण्यात आले. घटने दरम्यान परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते जखमींना तातडीने उपचारासाठी अकोल्यातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे त्यापैकी एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याने तिच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत या घटनेमुळे परिसरात उशिरा रात्रीपर्यंत तणावाची स्थिती निर्माण



झाली होती घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. एकापाठोपाठ एक पोलिसांच्या गाड्या येत असल्याचे पाहून अन्य परिसरातील नागरिकांमध्ये दंगा झाल्याची अफवा पसरली होती पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतली असून इतर आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत त्या घटने प्रकरणी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती जुने शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन लेव्हलकर यांच्या मार्गदर्शनात पुढील तपास सुरू असून परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

## वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात पोलीस यंत्रणा अपयशी

याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयीतांना ताब्यात घेतले असले तरी इतर आरोपी अद्याप मोकाटच फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे गुन्हेगारांवर वचक ठेवण्यात पोलीस अपयशी ठरत आहेत का असा सवाल आता उपस्थित होत आहे शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे. सोनटक्के प्लॉटमध्ये वरलीचे मोठे अड्डे असल्याने या परिसरात नेहमीच सटोड्यांचा तसेच अपराधिक प्रवृत्तींचा वावर असतो शहरात वरली अड्डे जरी बंद असले तरी सोनटक्के प्लॉटमधील वरली अड्डे मात्र बाराही महिने राजरोसपणे सुरू असतात हे मात्र विशेष

# ऑटो उलटून शेतमजूर महिलेचा मृत्यू, आठ जखमी

प्रतिनिधी ७ एप्रिल

**खामगाव :** शेगाव शहरातून शेतमजुरीसाठी जाणाऱ्या महिलांच्या ऑटोचा अपघात होऊन एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (६ एप्रिल) रोजी घडली. घटनेत ७ ते ८ महिलामजूर किरकोळ जखमी झाल्या असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उमाबाई सुहास अवचार (४७, रा. दसरा नगर, शेगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. ८ ते ९ महिला एमएच २८ टी ३८८२ या



क्रमांकाच्या ऑटोने शेतमजुरीसाठी जात असताना हॉटेल शिवराज व महालक्ष्मी मंदिराजवळ, बाळापूर रोडवर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ऑटो उलटला

. या अपघातात उमाबाई अवचार यांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर महिला जखमी झाल्या. जखमींना तत्काळ शेगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या लेखी मेमोवरून शेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** अन्नपूर्णा माता मंदिर परिसरात मोकळ्या जागेत महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला. यामुळे परिसरात खळबळ उडाली. ही हत्या की घातपात याचा तपास पोलिस करीत आहेत.

मृत महिला अंदाजे ३२ वर्षे वयोगटातील असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच डाबकी रोड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुरावे गोळा केले. अर्धवट जळालेला मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी



सर्वोपचार रुग्णालयात पाठवला. डाबकी रोड पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अभिषेक अंधारे यांनी मृत महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, संशयितांच्या हालचालींचा मागोवा

♦ पोलिसांनी तपास सुरू केला

घेतला जात आहे. तसेच स्थानिकांकडून माहिती गोळा करून तपासाची दिशा ठरविण्यात येत आहे. महिलेची आधी हत्या करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्यात आला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. उत्तरीय तपासणी अहवालातून मृत्यूचे कारण कळू शकेल. या प्रकरणाचा उलगडा करून आरोपी पर्यंत पोहोचणे पोलिसांसमोर आव्हान आहे.

# 'राधा स्मृती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल' ला 25 वर्षे पूर्ण, रोगनिदान शिबिर 6 ते 12 एप्रिलपर्यंत

प्रतिनिधी ७ एप्रिल

**अकोला :** शहरातच नव्हे तर संपूर्ण विदर्भात रुग्णसेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या राधा स्मृती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ला यशस्वी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२६ या कालावधीत भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

अकोला शहराच्या तापडिया नगर परिसरातील मोहन भाजी भंडार जवळ असलेल्या 'राधा स्मृती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'ने यशस्वी रुग्णसेवेची २५ वर्षे पूर्ण



केली आहेत. या प्रवासात हजारो रुग्णांनी येथे उपचार घेऊन व्याधीमुक्त जीवन जगण्यास सुरुवात केली आहे. या रुग्णालयात हृदयविकार व मधुमेह तज्ज्ञ डॉ. उदित लड्ढा, नेत्ररोग व रेटिना तज्ज्ञ डॉ. निशा लड्ढा, अस्थिरोग व जॉइंट रिप्लेसमेंट तज्ज्ञ डॉ. सुशांत लड्ढा, मूत्ररोग शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप लड्ढा आणि प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनीता लड्ढा आपल्या सेवा देत आहेत. हॉस्पिटलच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित या भव्य रोगनिदान शिबिराचे उद्घाटन डॉ. जुगल किशोर लड्ढा व ज्योती लड्ढा यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी प्रेम किशोर लड्ढा, अरुणा लड्ढा, जयप्रकाश चांडक, विणा चांडक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जुगलकिशोर लड्ढा, ज्योती लड्ढा, डॉ. कमलकिशोर लड्ढा, डॉ. सुनीता लड्ढा, चंद्रप्रकाश लड्ढा, आरती लड्ढा, ठाकूरदास राठी यांच्यासह अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. रौप्य महोत्सवानिमित्त ६ ते १२ एप्रिल या काळात सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत चालणाऱ्या या शिबिरात रुग्णांना अनेक मोफत सुविधा मिळणार आहेत, ज्यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, ईसीजी आणि शुगर तपासणी पूर्णपणे मोफत. लघवीच्या धारेची तपासणी आणि प्रोस्टेट ग्रंथी तपासणी मोफत. क्ष-किरण , सोनोग्राफी आणि रक्त चाचण्या अल्प दरात केल्या जातील. गरजू रुग्णांवर अत्यंत वाजवी दरात शस्त्रक्रिया केली जाणार आहे. या शिबिरासाठी केवळ ५० रुपये नोंदणी शुल्क असून, रुग्णांना मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आलेल्या 'हेल्थ किट'चे मोफत वाटप देखील केले जाणार आहे. जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राधा स्मृती हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

# मूर्तिजापूर येथील उड्डाण पुलावर युवतीची छेडखानी

प्रतिनिधी ७ एप्रिल

**मुर्तीजापुर:** मुर्तीजापुर दर्यापूर मार्गावर येणाऱ्या फ्लायओवर वर एका युवतीची छेडखानी करण्याची घटना समोर आली आहे शहर पोलिसांनी याप्रकरणी आरोपी युवकाविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केली आहे प्राप्त माहितीनुसार २८ वर्षाची युवती आणि आरोपी २९ वर्षीय जतिन वसंत संघवी यांची एक वर्षाआधी भेट झाली होती त्यानंतर त्यांच्यात प्रेम संबंध निर्माण झाले होते परंतु आरोपीचा रागीट स्वभाव आणि त्याच्या त्रासाला कंटाळून युवतीने त्याच्याशी बोलणे सोडून दिले आहेत त्यावरही आरोपी युवतीचा पिछा सोडण्यास तयार नव्हता युवतीवर तो लग्नासाठी दबाव आणत होता.

# अमरावती शहरात 16 सिलेंडरच्या चोरीत अकोल्याचा चोर सामील

प्रतिनिधी ७ एप्रिल

♦ गोवंश चोरीच्या तीन प्रकरणाची सुद्धा दिली कबुली

**अकोला :** अमरावती गुन्हे शाखेच्या पथकाने एका मोठ्या कारवाईत गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ट्रान्सपोर्ट नगर परिसरातून १६ सिलेंडरच्या चोरी प्रकरणी सोमवारी दोन कुख्यात चोरांना अटक केली आरोपीकडून चोरीचे सर्व सोळा सिलेंडर आणि गुन्ह्यात वापरलेल्या कारसह अंदाजे ५.३१ लाख रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला चौकशी दरम्यान आरोपींनी जनावरांच्या तस्करीच्या इतर तीन प्रकरणाची सुद्धा कबुली दिली अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अकोला शहरातील फिरदोस कॉलनी निवासी व सध्या कारंजा येथे राहणारा मोहम्मद कासिम मोहम्मद अकबर तसेच अमरावती शहरातील बिस्मिल्ला नगर निवासी शेख अतिक शेख रउफ यांचा समावेश आहे.

अमरावती शहरातील ट्रान्सपोर्ट नगर येथील तक्रारदार मोहम्मद साजिद मोहम्मद नासिर यांच्या गोदामातून अज्ञात चोरट्यांनी १६ गॅस सिलेंडर सोडल्याची तक्रार दाखल झाली होती गुन्हे शाखेने



गुप्त आणि तांत्रिक तपास सुरू केला दोन्ही आरोपींची नावे समोर आल्यानंतर चोरलेले गॅस सिलेंडर वाचवण्यासाठी दोन्ही येथील हॅलो कॉर्नर चौकात लपले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्या आधारे पोलिसांनी त्या ठिकाणी कारवाई करीत दोन्ही आरोपींना अटक करीत चोरीचे १६ सिलेंडर चोरी करण्यासाठी वापरलेली कार असा एकूण पाच लाख ३१ हजाराचा माल जप्त केला. चौकशीत या दोन्ही आरोपींनी गोवंश तस्करीच्या इतर तीन प्रकरणाची सुद्धा कबुली दिली

# श्रीगुरुवर्य श्रीराम महाराज मेहूणकर यांचा जन्मशताब्दी महोत्सव

प्रतिनिधी ७ एप्रिल

♦ राज्यभरातील नामवंत कीर्तनकारांची राहणार उपस्थिती

**अकोला :** राज्यातील संत परंपरेला समृद्ध करून चंदनाप्रमाणे आपले आयुष्य जगणारे संत मुक्ताबाई तथा पूज्य सखाराम महाराजांचे अनुग्रहित शिष्य पूज्य वैकुंठवासी पूज्य गुरुदेव श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या भव्य जन्म शताब्दी महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले असून यामध्ये अनेक कार्यक्रमासमवेत राज्यभरातील ख्यातनाम कीर्तनकारांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती श्री गुरु श्रीराम महाराज जन्मशताब्दी सेवा समितीच्या वतीने सोमवारी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार



परिषदेत देण्यात आली.

गुरुवार दिनांक १६ एप्रिल ते २३ एप्रिल पर्यंत नित्य रात्री सात ते रात्री नऊ वाजेपर तालुक्यातील अंत्री मलकापूर येथील श्री स्वयंभू महादेव मंदिर प्रांगणात हा पावन जन्मशताब्दी सोहळा होणार असून या आयोजनात अकोला बुलढाणा जिल्ह्यातील तसेच बाळापूर तालुक्यातील अंतिम मलकापूर मंच पंचक्रोशीतील गावकरी वारकरी ग्रामस्थ यात योगदान देणार आहेत या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित कीर्तन महोत्सवात नित्य रात्री सात ते नऊ वाजेपर्यंत चालणाऱ्या या कीर्तन महोत्सवात गुरुवार दिनांक १६ एप्रिल रोजी देव येतील कीर्तनकार व तुकाराम महाराज यांचे वंशज ह भ प बापूसाहेब मोरे यांचे कीर्तन होणार आहे शुक्रवार दिनांक १७ एप्रिल रोजी परभणी येथील ह भ प अच्युत प्रस्तारकर शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी आळंदी येथील ह भ प ज्ञान सिंधू शिंदे रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी मोठी आळंदी येथील ह भ प ज्ञानेश्वर महाराज कदम सोमवार दिनांक २० एप्रिल रोजी ह भ प संजय महाराज पाचपोर मंगळवार दिनांक २१ एप्रिल रोजी ह भ प रामदास महाराज ढोक बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी छोटी आळंदी येथील ह भ प ज्ञानेश्वर महाराज कदम गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी ह भ प तुकाराम महाराज सखाराम पुरकर यांची पावन उपस्थिती लाभणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा संपूर्ण महोत्सवास समाजसेवी अरविंद देठे यांचे विशेष सहकार्य लाभणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले या सप्ताहात सकाळी चार वाजता काकडा हनुमान चालीसा पठाण सकाळी आठ वाजता ज्ञानेश्वरी पारायण साडेअकरा वाजता राम कृष्ण हरी महामंत्र जप त्याचा बारा वाजता महाप्रसाद दुपारपासून श्रीराम महाराजांचे चरित्र पठण दुपारी तीन वाजता प्रवचन चार वाजता हरिपाठ व रात्री सात वाजता कीर्तन कार्यक्रम होणार असून यामध्ये समस्त भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन श्री गुरु श्रीराम महाराज मेहूणकर जन्मशताब्दी महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

## माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९,
९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK